

# महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग







## वार्षिक अहवाल

## २०२०-२०२१











# महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

## वार्षिक अहवाल
## २०२० – २१

कार्यालय

**तिसरा मजला, शासकीय परिवहन सेवा इमारत,**
**सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई**
**महाराष्ट्र राज्य**

**मा. मंत्री,**
**<u>महिला व बाल विकास, महाराष्ट्र शासन</u>**



**मा. श्रीम. ॲड. ठाकूर यशोमती चंद्रकांत (सोनावणे)**
**(३०.१२.२०१९ ते अद्यापपर्यंत)**

**<u>मा. राज्यमंत्री,</u>**
**<u>महिला व बाल विकास, महाराष्ट्र शासन</u>**



**मा. श्री. ओमप्रकाश उर्फ बच्चू बाबुराव कडू**
**(३०.१२.२०१९ ते अद्यापपर्यंत)**

# महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची रचना

**आयोगामध्ये अध्यक्ष आणि सहा सदस्य आणि एक सचिव यांचा समावेश आहे.**
**आयोगामध्ये १२ कर्मचारी होते.**

## आयोगाचे अध्यक्ष



**मा.श्री. प्रवीण घुगे**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

## आयोगाचे सदस्या

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग



श्री. अशोक शिंदे
सदस्य



डॉ. शालिनी कराड
सदस्या



प्रो.अस्मा शेख (पटेल)
सदस्या



श्री. विजय जाधव
सदस्य



ॲड. स्वरदा केळकर
सदस्या



डॉ. वृषाली देशपांडे
सदस्या

# <u>आयोगाच्या सचिव</u>



श्रीम. सीमा व्यास (भा. प्र. से.)
सचिव,
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

| | |
|---|---|
| **सचिव :-** | **श्रीमती स्वाती म्हसे पाटील**<br>(१-१-२०२१ ते १७-१-२०२१)<br>**श्री. उदय जाधव, भा. प्र. से.**<br>(१८-१-२०२१ ते वर्ष अखेर पर्यन्त) |
| **अध्यक्षा व सदस्या :-** | दि. २०-५-२०२० पासून आयोग स्थापन करण्यात आलेला नाही |

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शीर्ष | | पान क्र. |
|---|---|---|---|
| i. | **लघुनामे** | | |
| प्रकरण १ | **प्रस्तावना** | | १ |
| प्रकरण २ | **आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय विधिविधाने** | | २ |
| प्रकरण ३ | **आयोगाची संघटनात्मक संरचना** | | ४ |
| प्रकरण ४ | **आयोगाचे कार्य व अधिकार** | | ५ |
| प्रकरण ५ | **बालकांशी निगडीत प्रमुख कायदे** | | |
| | अ) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ | | ७ |
| | ब) बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ | | ७ |
| | क) लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षक कायदा (पोक्सो) २०१२ | | ९ |
| | ड) लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षक कायदा सुधारणा (पोक्सो) २०१९ - टिपणी | | १२ |
| प्रकरण ६ | **आयोगाचे उपक्रम व कार्ये** | | |
| | अ) बालकांची देखभाल करणाऱ्या संस्था व कर्मचाऱ्यांसाठी आयोगाने एप्रिल २०२० मध्ये जारी केलेले दिशा निर्देश | | १५ |
| | ब) आयोगा तर्फे घेण्यात आलेले विविध ऑन लाइन वेबिनार :- | | १७ |
| | १ | कोविड-१९ महामारीच्या काळात चाइल्ड केअर इन्स्टिट्यूशन (CCIS) मध्ये व्हायरसचा प्रसार रोखण्यासाठी प्राधान्याने उपाययोजना करणे साठी ३६ जिल्ह्यातील महिला बाल विकास अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण पथक व बालकांची देखभाल करणाऱ्या संस्था सोबत विभाग निहाय संवाद (कोकण, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, अमरावती) | १७ |
| | २ | ऑनलाईन लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण करणाऱ्या धोरणाच्या अंमलबजावणी साठी वेबीनार | २३ |
| | ३ | कोरोना विषाणू संसर्गामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागाशी संबंधित विषयाबाबत चर्चा | २५ |
| | ४ | महाराष्ट्रातील मुलांवर होणाऱ्या जघन्य ऑनलाईन अपराध हाताळण्यासाठी केरळ सायबर पोलिसांच्या समवेत चर्चा | २५ |
| | ५ | कोव्हीड १९ टाळेबंदीच्या पश्चात मार्गदर्शक सूचना व प्रक्रियांबाबत बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम | २६ |
| | ६ | शिक्षण, आरोग्य व बाल न्याय ( देखभाल व संरक्षण ) अधिनियम, २०१५ बाबत बालकांची देखभाल करणाऱ्या संस्था आणि अन्य बालक संरक्षण पदाधिकाऱ्यांचे २ दिवशीय प्रश्नोत्तर सत्र | २९ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ७ | पॉक्सो ॲक्ट अंतर्गत २०१९ मधील दुरुस्ती आणि त्याची covid-१९ च्या कालावधीत प्रभावी अंमलबजावणी | ३१ |
| | ८ | लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण अधिनियमात सन २०१९ मध्ये झालेल्या दुरुस्त्या व कोव्हीड १९ दरम्यान त्याची प्रभावी अंमलबजावणी बाबत प्रश्नोत्तर वेबीनार | ३३ |
| **प्रकरण ७** | **नमुना “अ” तक्रारींचा तपशील** | | ३६ |
| **प्रकरण ८** | **ऑडिटरचा अहवाल व ताळेबंद अहवाल** | | ३७ |

➢ टिप - लघुनामे

| | |
|---|---|
| ए डी जी पी | अतिरिक्त पोलीस महासंचालक (Additional Director General of Police) |
| सी सी आय | बालकांची देखभाल करणाऱ्या संस्था (Childcare Institution) |
| सी सी एस ई | बालकांच्या लैंगिक शोषणाचा सामना करणे (Countering Child Sexual Exploitation) |
| सी डब्ल्यू सी | बालक कल्याण समिती (Child Welfare Committee) |
| सी डब्ल्यू पी ओ | बालक कल्याण पोलीस अधिकारी (Child Welfare Police Officer) |
| डी सी पी यू | जिल्हा बालक संरक्षण पथक (District Child Protection Unit) |
| डी ओ | जिल्हा अधिकारी (District Officer) |
| डी डब्ल्यू सी डी | महिला व बाल कल्याण विभाग (Department of Women and Child Development) |
| आय ए एस | भारतीय प्रशासकीय सेवा (Indian Administration Services) |
| आय सी एम ई सी | बेपत्ता आणि शोषित बालकांसाठी आंतरराष्ट्रीय केंद्र (International Centre for Missing and Exploited Children) |
| आय जी | महानिरीक्षक (Inspector General) |
| आय जे एम | आंतरराष्ट्रीय न्याय अभियान (International Justice Mission) |
| आय पी एस | भारतीय पोलीस सेवा (Indian Police Service) |
| जे जे ॲक्ट | बाल न्याय अधिनियम, २०१५ (Juvenile Justice Act, 2015) |
| जे जे बी | बाल न्याय मंडळ (Juvenile Justice Board) |
| एम ओ यू | सामंजस्य करार (Memorandum of Understanding) |
| एम एस सी पी सी आर | महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग (Maharashtra State Commission for Protection of Child Rights) |
| एन सी एम ई सी | बेपत्ता आणि शोषित बालकांसाठी राष्ट्रीय केंद्र (National Centre for Missing and Exploited Children) |
| एन सी पी सी आर | राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग (National Commission for Protection of Child Rights) |
| एन सी आर बी | राष्ट्रीय गुन्हे अभिलेख कार्यालय (National Crime Records Bureau) |
| पी पी पी | सार्वजनिक - खासगी भागीदारी ( Public Private Partnership ) |
| पी डब्ल्यू सी | प्राईसवाटर हाउस कुपर्स ( PricewaterhouseCoopers ) |
| एस सी | सर्वोच्च न्यायालय ( Supreme Court ) |
| एस आय आर | सामाजिक तपास अहवाल ( Social Investigation Report ) |
| एस जे पी यु | पोलीस विशेष बालक पथक ( Special Juvenile Police Unit ) |
| एस पी | पोलीस अधीक्षक ( Superintendent of Police ) |

# प्रकरण १. प्रस्तावना

बालके ही, कोणत्याही राष्ट्राची अत्यंत मौल्यवान संपत्ती असते आणि अनुकूल व सहाय्यभूत वातावरण उपलब्ध करून दिले तर, प्रत्येक बालक हे, प्रगल्भ, प्रौढ व्यक्तीमध्ये विकसित होईल आणि देशाचा जबाबदार नागरिक होईल. अशा प्रकारे, समाजाच्या सर्वंकष विकासासाठी योग्य बालविकास अत्यंत महत्त्वपूर्ण आहे आणि राष्ट्रीय मानव संसाधन विकासासाठी बालकांची योग्य काळजी घेणे हा, उत्तम मार्ग आहे. भारत हा सर्वाधिक बाल लोकसंख्या असलेला देश आहे.

भारताच्या संविधानाने, लिंग, वय, जात आणि आर्थिक दर्जा विचारात न घेता, बालकांसह आपल्या सर्व नागरिकांना समान हक्क बहाल केलेले आहेत. बालकांच्या हक्कांचे, प्रामुख्याने त्यांच्या जीवनातील सर्व बाबींचा समावेश करून पुढील चार प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जातेः जीविताचा हक्क, संरक्षणाचा हक्क, विकासाचा हक्क व सहभाग घेण्याचा हक्क हे हक्क अंमलात आणण्यासाठी आपल्या घटनात्मक तरतुदींच्या धर्तीवर अनेक महत्त्वाचे कायदे अधिनियमित करण्यात आलेले आहेत. त्यापैकी काही महत्त्वाच्या कायद्यांमध्ये, बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५, लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण (पोक्सो) अधिनियम, २०१२ आणि बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांचा समावेश असून त्यात इतर गोष्टींबरोबरच आपल्या देशातील बालकांसाठी अनुकूल व संरक्षणात्मक वातावरण तयार करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ अंमलात आल्याने, बालकांच्या हक्कांना प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांचे संरक्षण करण्यासाठी शासनाद्वारे उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यामधील एक नवीन टप्पा सुरू झाला आहे. सर्व कायदे, धोरणे, कार्यक्रम व प्रशासकीय यंत्रणा या, भारताच्या संविधानामध्ये आणि तसेच संयुक्त राष्ट्र संघाच्या बालकांच्या हक्कांबाबतच्या अभिसंधीमध्ये (UNCRC) संविनिर्दिष्ट केलेल्या यथार्थ दर्शी बाल हक्कांशी सुसंगत आहेत याची सुनिश्चिती करण्यासाठी यामध्ये राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग व राज्य बाल हक्क संरक्षण आयोग गठीत करण्याची तरतूद केलेली आहे.

राष्ट्रीय स्तरावर २००७ मध्ये, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाची स्थापना केल्यापासून आत्तापर्यंत राज्यांमध्ये ३४ बाल हक्क संरक्षण आयोग स्थापित असून संबंधित विविध कायद्यांमध्ये अनिवार्य केल्याप्रमाणे, बाल हक्कांचे उल्लंघन केल्याबाबत चौकशी करण्यासाठी आणि बाल हक्कांचे संरक्षण व प्रचलन करण्यासाठी अन्य उपक्रम हाती घेण्याकरिता त्यांची स्थापना करण्यात आलेली आहे.

# प्रकरण – २ आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय विधीविधाने

**बाल हक्कांचे संरक्षण करणारे करार :**

मुलांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठ्या संख्येने अधिवेशने, संधी, कायदे आणि सनद लागू करण्यात आले आहेत. संबंधित कायदेशीर चौकटीची रुपरेषा खालील नमूद केल्याप्रमाणे आहे.

**१. आंतरराष्ट्रीय विधानः- बालकांच्या हक्कांवर संयुक्त राष्ट्रांचे अधिवेशन (UNCRC)**

१९८९ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने अंगीकृत केलेली बाल हक्कविषयक अभिसंधी (सीआरसी) हा, भारतासह बहुसंख्य विकसित तसेच विकसनशील देशांनी अनुसमर्थन केलेला सर्व स्वीकृत असा संयुक्त राष्ट्रांचा करार आहे. या अभिसंधीमध्ये, बालकांच्या सर्वोत्तम हिताचे संरक्षण करताना, सर्व राज्य पक्षकारांनी अनुसरण करावयाची मानके विहित केलेली आहेत आणि बालकांचे मूलभूत हक्क अधोरेखित केलेले आहेत. या अभिसंधीचे अनुसमर्थन करणाऱ्या देशांनी, तिच्या तरतुदीं, कायदेशीररित्या बंधनकारक असल्याचे मान्य केले आहे. या अभिसंधीच्या तरतुदींचे पालन करण्यासाठी त्यांनी हाती घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत ते बाल हक्कविषयक तज्ज्ञांना नियमितपणे अहवाल देतात.

संयुक्त राष्ट्रांच्या बाल हक्कविषयक अभिसंधी (युएनसीआरसी) नुसार, बालकांचे हक्क हे वंश,रंग, लिंग, भाषा, धर्म, मूळ, संपत्ती, जन्मविषयक दर्जा किंवा क्षमता विचारात न घेता,१८ वर्षांखालील सर्व व्यक्तींना द्यावयाचे किमान हक्क व स्वातंत्र्य आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या बाल हक्क विषयक अभिसंधी (युएनसीआरसी) मध्ये ५४ अनुछेद असून त्या प्रत्येकामध्ये विविध प्रकारचे हक्क अंतर्गत आहेत जसे की :

- जीविताचा हक्क
- विकासात्मक हक्क
- संरक्षणाचा हक्क
- सहभागी होण्याचा हक्क

**सभा करार कलम १६ मध्ये असे नमूद केले आहे की :-**

i. कोणतेही बालक, त्याची / तिची गोपनीयता, कुटुंब, किंवा पत्रव्यवहार यांमध्ये अनियंत्रित किंवा बेकायदेशीरपणे हस्तक्षेप करण्यास, किंवा त्याची किंवा तिची प्रतिष्ठा व सन्मान यांवर बेकायदेशीरपणे हमला करण्यास अधीन असणार नाही.

ii. अशा हस्तक्षेपा विरुद्ध किंवा हमल्या विरुद्ध कायद्याचे संरक्षण मिळण्याचा बालकाला हक्क आहे. सभा करार कलम ४० मध्ये असे नमूद केले आहे की, दंडात्मक कायद्याचे उल्लंघन केल्याचा आरोप असलेल्या बालकाची गोपनीयता, कार्यवाहीच्या सर्व टप्प्यावर संरक्षित करण्यात यावी.

सन २००५ मध्ये, केंद्र शासनाने, सशस्त्र संघर्षातील बालकांचा सहभाग आणि बालकांची विक्री, बाल वेश्याव्यवसाय व बाल अश्लीलता यांचे निवारण करणाऱ्या बालकांच्या हक्कांवरील संयुक्त राष्ट्रांचे अधिवेशनाच्या दोन वैकल्पिक प्रोटोकॉलचा अंगीकार केला आहे. हिंसाचाराच्या व पिळवणुकीच्या या धोकादायक प्रकारांपासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी भारताने आपल्या राष्ट्रीय धोरणास बळकटी दिली आहे आणि उपाययोजना केल्या आहेत.

## २. राष्ट्रीय विधान :- भारताचे संविधान

भारताच्या संविधानाने बालकांच्या दुर्बलतेस आणि त्यांच्या संरक्षणाच्या हक्कांस मान्यता दिली आहे. संरक्षणात्मक भेदभावाचे तत्व अनुसरून, बालकांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक व विशेष कायदे व धोरणे याद्वारे बालकांकडे विशेष लक्ष देण्यासाठी अनुच्छेद १५ मध्ये हमी दिली आहे.

समानतेचा हक्क, जीवनाचे संरक्षण आणि वैयक्तिक स्वातंत्र्य आणि शोषणविरोधी हक्क ह्या सगळ्या बाबी घटनेचे कलम १४, १५, १५(३), १९(१)(ए),२१, २१(ए), २३, २४, ३९(इ), ३९(फ), व ४५ हयात अधोरेखित आहेत. तसेच हे कलम बालकांसह, सर्व लोकांचे संरक्षण, सुरक्षा आणि त्यांचे कल्याण करण्याचे प्रतिबद्धतेचे पुनरुच्चार करतात. संबंधित अनुच्छेदातील तरतुदी खालील प्रमाणे आहेत.

**अनुच्छेद १४ :** राज्य, कोणत्याही व्यक्तीस, भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे समान संरक्षण नाकारणार नाही.

**अनुच्छेद १५ :** राज्य, कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशा प्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून भेदभाव करणार नाही.

**अनुच्छेद १५(३):** या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, महिला व बालके यांच्याकरिता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

**अनुच्छेद १९(१)(ए) :** सर्व नागरिकांस, भाषण व अभिव्यक्ती यांच्या स्वातंत्र्याचा हक्क असेल.

**अनुच्छेद २१ :** कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज, कोणत्याही व्यक्तीस तिचे जीवित किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य यापासून वंचित केले जाणार नाही.

**अनुच्छेद २१ (ए) :** ६ ते १४ वर्षे वयाच्या सर्व बालकांसाठी मोफत व सक्तीचे शिक्षण.

**अनुच्छेद २३ :** माणसांचा अपव्यापार आणि वेठबिगारी यांना मनाई; माणसांचा सर्व अपव्यापार आणि बिगार व त्यासारख्या अन्य स्वरूपातील वेठबिगारीस मनाई करण्यात आली आहे आणि या तरतुदीचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणे हा कायद्यानुसार दंडनीय अपराध असेल.

**अनुच्छेद २४:** कारखाने, इत्यादींमध्ये बालकांना कामाला ठेवण्यास मनाईः १४ वर्षे वयाखालील कोणत्याही बालकास, कोणत्याही कारखान्यात किंवा खाणीत काम करण्यासाठी नोकरीत ठेवले जाणार नाही अथवा अन्य कोणत्याही धोकादायक कामावर लावले जाणार नाही.

**अनुच्छेद ३९ : राज्याने अनुसरावयाच्या धोरणाची विवक्षित तत्वे.**

(इ) स्त्री व पुरुष कामगारांचे आरोग्य व ताकद आणि बालकांचे कोवळे वय यांचा दुरुपयोग करून घेण्यात येऊ नये आणि नागरिकांना आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय किंवा ताकद यास न पेलणाऱ्या व्यवसायात शिरण्यास भाग पाडू नये.

(फ) बालकांना निरामय पद्धतीने आणि मुक्त व प्रतिष्ठापूर्वक वातावरणात आपला विकास करण्याची संधी व सुविधा दिल्या जाव्यात आणि बालके व युवक यांना शोषणापासून आणि नैतिक व भौतिक गरजांच्या बाबतीत उपेक्षेपासून संरक्षण दिले जावे.

**अनुच्छेद ४५ :** सर्व बालकांसाठी त्यांच्या वयाची सहा वर्षे पूर्ण होईपर्यंत प्रारंभिक बाल्यावस्थेतील देखभाल आणि शिक्षण यांसाठी तरतूद करण्याकरिता राज्य प्रयत्नशील राहील.

**प्रकरण -३ आयोगाची संघटनात्मक रचना**

| अ. क्र. | नाव | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | मा. श्री. प्रवीण घुगे | अध्यक्ष | माहे जाने. २०१९ ते माहे मे २०२० |
| २ | श्री. संतोष शिंदे | सदस्य | माहे जाने. २०१९ ते माहे डिसेंबर २०२० |
| ३ | डॉ. शालिनी कराड | सदस्या | माहे जाने. २०१९ ते माहे डिसेंबर २०२० |
| ४ | प्रा. श्रीमती अस्मा शेख | सदस्या | माहे जाने. २०१९ ते माहे डिसेंबर २०२० |
| ५ | श्री. विजय जाधव | सदस्य | माहे जाने. २०१९ ते माहे डिसेंबर २०२० |
| ६ | ॲड. स्वरदा केळकर | सदस्या | माहे जाने. २०१९ ते माहे डिसेंबर २०२० |
| ७ | डॉ. वृषाली देशपांडे | सदस्या | माहे जाने. २०१९ ते माहे डिसेंबर २०२० |

**आयोगाच्या कार्यालयातील प्रशासकीय संरचना**

| | पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | सचिव | १ | १ | ० |
| २ | विधी सल्लागार | १ | १ | ० |
| ३ | प्रशासकीय अधिकारी | १ | १ | ० |
| ४ | सहायक प्रशासकीय अधिकारी तथा लेखा अधिकारी | १ | १ | ० |
| ५ | उच्च श्रेणी लघुलेखक | २ | १ | १ |
| ६ | परिवीक्षा अधिकारी | २ | २ | ० |
| ७ | लिपिक | २ | २ | ० |
| ८ | शिपाई | २ | २ | ० |

## प्रकरण – ४ आयोगाची कार्ये व अधिकार

**(अ) बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आयोगाची कार्ये खालीलप्रमाणे आहेत :**

**१. आयोग खालीलपैकी सर्व किंवा कोणतीही कार्ये पार पाडेल, जसे की,**

| | | |
|---|---|---|
| i | बाल हक्कांच्या संरक्षणासाठी कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्या अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या संरक्षणाची तपासणी करणे आणि आढावा घेणे आणि त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपायांची शिफारस करणे; | |
| ii | आयोगास योग्य वाटेल तसे वार्षिक आणि अशा नियतकालिक राज्य शासनास, त्या खबरदारीचे उपाय म्हणून कामाचा अहवाल सादर करणे; | |
| iii | बालकांच्या अधिकारांचे उल्लंघन केल्याबद्दल चौकशी करणे आणि अशा प्रकरणांमध्ये कार्यवाहीची शिफारस करणे; | |
| iv | दहशतवाद, जातीय हिंसाचार, दंगली, नैसर्गिक आपत्ती, घरगुती हिंसाचार, एचआयव्ही/एड्स, तस्करी, दुर्व्यवहार, छळ व शोषण, अश्लील साहित्य आणि वेश्याव्यवसाय यांनी बाधित झालेल्या बालकांना त्यांच्या हक्कांचा फायदा घेण्यास प्रतिबंध करणाऱ्या सर्व बाबींचे परीक्षण करणे आणि योग्य उपाययोजनांची शिफारस करणे; | |
| v | विशेष काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांशी संबंधित समस्यांकडे लक्ष देणे, ज्यात त्रस्त बालक, उपेक्षित आणि वंचित बालक, विधीसंघर्षग्रस्त बालके, अल्पवयीन बालक, कुटुंब नसलेली बालके आणि कैद्यांची बालके यांचा समावेश आहे व तसेच योग्य उपाययोजनांची शिफारस करणे; | |
| vi | करार आणि इतर आंतरराष्ट्रीय साधनांचा अभ्यास करणे आणि विदयमान धोरण, कार्यक्रमांचे नियोजन आणि बालकांच्या हक्कांवरील इतर उपक्रमांचा नियमित आढावा घेणे आणि बालकांच्या सर्वोत्तम हितासाठी त्या उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिफारसी करणे; | |
| vii | बाल हक्कांच्या क्षेत्रात संशोधन हाती घेणे आणि संशोधनासाठी प्रोत्साहन देणे; | |
| viii | समाजातील विविध घटकांमध्ये बाल हक्कांबाबत साक्षरता पसरवणे आणि प्रकाशने, माध्यमे, चर्चासत्र आणि इतर उपलब्ध माध्यमांद्वारे या अधिकारांच्या संरक्षणासाठी उपलब्ध असलेल्या संरक्षणाविषयी जागरूकता वाढविणे; | |
| ix | राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सुधारगृह किंवा बालकांसाठी असणाऱ्या निवासस्थान किंवा संस्थांची तपासणी करणे, कोणत्याही सामाजिक संस्थेद्वारे चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही संस्थेसह इतर कोणतेही प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील, कोणतेही बाल संरक्षक निवारागृह किंवा ठिकाण, बालकांना सुधारण्यासाठी किंवा संरक्षणाच्या उद्देशाने ताब्यात घेण्यात येते किंवा दाखल केले जाते आणि आवश्यक वाटल्यास त्यावर योग्य ती कार्यवाहीसाठी या अधिकाऱ्यांकडे नेणे. | |
| x | तक्रारींची चौकशी करणे आणि खाली नमूद केलेल्या बाबींसंबंधित स्वयंप्रेरणेने सूचना देणेः | |
| | (i) बालकांच्या अधिकारांची उल्लंघन आणि वंचित ठेवणे | |
| | (ii) बालकांच्या संरक्षणासाठी आणि विकासासाठी प्रदान केलेल्या कायद्याची अंमलबजावणी न करणे. | |
| | (iii) बालकांचे त्रास कमी करण्याच्या आणि कल्याण सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने धोरणात्मक निर्णय, मार्गदर्शक तत्त्वे किंवा सूचनांचे पालन न करणे, तसेच अशा बालकांना आराम प्रदान करणे किंवा अशा प्रकरणांमध्ये उद्भवणारे मुद्दे योग्य अधिकाऱ्यांकडे उपस्थित करणे. | |
| xi | बालकाच्या हक्कांच्या वाढीसाठी अशी इतर आवश्यक कार्ये आणि उपरोक्त कार्यांमध्ये अनुषंगिक कोणतीही बाब. | |

## (२) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या नियमानुसार ७ चा नियम, २०१०.

| | |
|---|---|
| १ | बाल हक्क कराराचे अनुपालन करण्यात येते किंवा नाही याचे निर्धारण करण्यासाठी विद्यमान कायदा, धोरण आणि कार्यप्रणालीचे विश्लेषण करणे, बालकांवर परिणाम करणाऱ्या धोरणाच्या अथवा कार्यप्रणालीच्या कोणत्याही पैलुची चौकशी करून अहवाल देणे आणि बाल हक्कांच्या दृष्टिकोनातून प्रस्तावित नवीन विधीविधानावर अभिप्राय देणे. |
| २ | त्या संरक्षक उपाययोजनांच्या कामावरील अहवाल शासन, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग आणि राज्याच्या इतर आयोगांकडे दरवर्षी व राज्य आयोगाला योग्य वाटेल अशा इतर कालांतराने सादर करणे; |
| ३ | बालकांनी स्वतःहून केलेल्या किंवा त्यांच्या वतीने कोणत्याही संबंधित व्यक्तीने केलेल्या अथवा बाल हक्कांचे उल्लंघन झाल्याची कोणतीही बाब जेव्हा आयोगाच्या निदर्शनास येईल तेव्हा आयोगाने स्वाधिकारे दाखल केलेल्या कोणत्याही तक्रारीवर विशेष चौकशी हाती घेणे; |
| ४ | बालकांचे प्राधान्यक्रम आणि कल्पनांचे प्रतिबिंब दिसून यावे म्हणून पालकांचा दृष्टिकोन आयोगाला थेट कळविण्यात आल्याची आयोगाच्या कामकाजावरून खात्री करून घेणे; |
| ५ | आयोगाने तसेच बालकांची संबंधित काम करणाऱ्या शासकीय विभागांनी आणि संघटनांनी आपल्या कामकाजातून बालकांच्या विचारांचा प्रसार करणे, त्यांना योग्य तो न्याय देणे आणि त्याची गंभीर दखल घेणे; |
| ६ | बाल हक्कविषयक माहिती तयार करणे आणि तिचा प्रसार करणे; |
| ७ | शालेय पाठ्यक्रमात शिक्षकांच्या प्रशिक्षणामध्ये बाल हक्काचा समावेश करण्यास प्रोत्साहन देणे आणि बालकांशी निगडित काम करणाऱ्या कर्मचारी वर्गाला प्रशिक्षण देणे. |

## प्रकरण – ५ बालकांशी निगडीत इतर कायदे :-

**(अ ) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ :-** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ च्या कलम ३१ आणि ३२ अंतर्गत राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाला पुढील कार्ये सोपविण्यात आली आहेत.

| | |
|---|---|
| (i) | या अधिनियमाद्वारे किंवा त्या अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या संरक्षणाची तपासणी करणे व त्यांचा आढावा घेणे आणि त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपाययोजनांची शिफारस करणे. |
| (ii) | बालकांच्या मोफत व अनिवार्य शिक्षणासंबंधी तक्रारींची चौकशी करणे आणि |
| (iii) | बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियमाची कलम १५ व २४ या अन्वये तरतूद केल्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करणे. |
| (iv) | बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्कासंबंधित कोणत्याही बाबींची चौकशी करताना बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम कलम १४ व २४ अन्वये त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा समान अधिकार असेल. |
| (vi) | पोटकलम ३२(१) अंतर्गत तक्रार प्राप्त झाल्यानंतर स्थानिक प्राधिकरण संबंधित पक्षांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत या बाबीवर निर्णय देईल. |
| (vii) | स्थानिक प्राधिकरणाच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडे किंवा यथास्थिती कलम ३२ पोट कलम ३ अन्वये विहित केलेल्या प्राधिकरणाकडे अपिल करता येईल |

**(ब ) १. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ हा एक सर्वसमावेशक कायदा असून त्याद्वारे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० निरसित केलेला आहे. या अधिनियमांमध्ये, विकासाच्या गरजा पुरवून, आणि बालकांच्या सर्वोत्तम हितार्थ, प्रकरणांचा निर्णय घेण्यामध्ये व ती निकालात काढण्यामध्ये बालस्नेही दृष्टिकोन स्वीकारून त्याद्वारे काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके आणि विधी संघर्षग्रस्त बालके (CICL) अशा दोन्हींसाठी, आणि या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या विविध संस्थांमार्फत त्यांचे संपूर्ण पुनर्वसन करण्यासाठी तरतूद केलेली आहे.

जे गुन्हे, आत्तापर्यंत अन्य कोणत्याही कायद्याखाली समाविष्ट केलेले नव्हते, असे बालकांविरुद्ध केले जाणारे अनेक नवीन गुन्हे, या अधिनियमांमध्ये समाविष्ट केलेले आहेत. यामध्ये, अवैध दत्तक ग्रहणासह कोणत्याही प्रयोजनासाठी बालकांची विक्री व खरेदी करणे, बाल देखभाल संस्थांमधील शारीरिक शिक्षा, दहशतवादी गटांद्वारे बालकांचा वापर, अपंग बालकांविरुद्धचे गुन्हे आणि बालकांचे अपहरण या गुन्ह्यांचा समावेश होतो.

या अधिनियमात, बाल न्याय मंडळ व बाल कल्याण समिती यांचे अधिकार, कार्य व जबाबदाऱ्या यांमध्ये सुस्पष्ट तरतूद केली आहे. बाल गुन्हेगारांनी केलेल्या अत्यंत गंभीर गुन्ह्यांची प्रकरणे, त्यांची प्रौढ म्हणून न्याय चौकशी करावी किंवा कसे हे निर्धारित करण्यासाठी प्राथमिक मूल्यमापन केल्यानंतर, बाल न्यायालयाकडे (सत्र न्यायालयाकडे) हस्तांतरित करण्याचा पर्याय, बाल न्याय मंडळास दिला आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ याबरोबरच बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० च्या कलम २१ खाली देखील महत्त्वाची तरतूद अंतर्भूत असून त्या अन्वये या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीमध्ये सहभागी विधीसंघर्षग्रस्त बालके किंवा काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके यांची नावे, इत्यादी प्रसिद्ध करण्यास मनाई केलेली आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमाच्या कलम १०९ नुसार, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाकडे व राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडे या अधिनियमाच्या तरतुदींचे सनियंत्रण व अंमलबजावणी करण्याची कामे सोपविलेली आहेत. ही कामे, उक्त अधिनियमाखालील कामांशिवाय सोपवलेली आहेत.

## (ब) २. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ खालील प्राधिकरणे

| बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमाखालील विविध स्तरावरील प्राधिकरणे / अभिकरणे / संस्था / कार्याधिकारी | | |
|---|---|---|
| **तपशील** | **ज्या स्तरावर तिची रचना केली आहे तो स्तर** | **त्यांच्या स्थापनेसाठी जबाबदार असलेले प्राधिकरण** |
| **मंडळे** | | |
| केंद्रीय सल्लागार मंडळ | राष्ट्रीय | केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालय |
| राज्य सल्लागार मंडळ | राज्य | निवड समितीमार्फत राज्य शासन |
| जिल्हा / शहर सल्लागार मंडळ | जिल्हा | राज्य शासन |
| बाल न्याय मंडळ | जिल्हा | निवड समितीने केलेल्या शिफारशीवरून राज्य शासन |
| **समित्या** | | |
| निवड समिती | राज्य | राज्य शासन |
| निरीक्षण समिती केवळ बालगृहासाठी | राज्य | राज्य शासन |
| निरीक्षण समिती केवळ बालगृहासाठी | जिल्हा | निवड समितीने केलेल्या शिफारशीवरून राज्य शासन |
| बाल कल्याण समिती | जिल्हा | निवड समितीने केलेल्या शिफारशीवरून राज्य शासन |
| बाल समिती | प्रत्येक संस्थेमध्ये | संस्थेचा प्रभारी अधिकारी |
| व्यवस्थापन समिती | प्रत्येक संस्थेमध्ये | जिल्हा बाल संरक्षण युनिट किंवा जेथे जिल्हा बाल संरक्षण युनिट नसेल तेथे जिल्हा दंडाधिकारी / जिल्हाधिकारी |
| **प्राधिकरणे / युनिटे / संघटना / अभिकरणे (एजन्सी)** | | |
| राज्यस्तरीय सहाय्य सेवा प्राधिकरण | राज्य | राज्य शासन |
| राज्य बाल संरक्षण युनिट (एससीपीयु) | राज्य | राज्य शासन |
| जिल्हा बाल संरक्षण युनिट (डीसीपीयु) | जिल्हा | राज्य शासन |
| विशेष बाल पोलीस युनिट (एसजेपीयु) | जिल्हा | राज्य शासन |
| गृहे / संस्थात्मक देखभाल सुविधा | | |
| बालगृहे (सीएनसीपी) | जिल्हा | राज्य शासन |
| निवारागृहे (सीएनसीपी) | जिल्हा | राज्य शासन |
| विशेषीकृत दत्तक अभिकरणे (सीएनसीपी) | जिल्हा | राज्य शासन |
| सेवा संस्था काळजी पश्चात संघटना (सीसीएल+ सीएनसीपी) | जिल्हा | राज्य शासन |
| निरीक्षण गृहे (सीसीएल) | जिल्हा | राज्य शासन |
| विशेष गृहे (सीसीएल) | जिल्हा | राज्य शासन |

| | | |
|---|---|---|
| सुरक्षिततेचे ठिकाण (सीसीएल) | जिल्हा | राज्य शासन |
| कार्याधिकारी | | |
| मुख्य न्यायदंडाधिकारी | जिल्हा | त्या राज्याचे उच्च न्यायालय |
| परीविक्षा अधिकारी | जिल्हा | राज्य शासन |
| कल्याण अधिकारी | जिल्हा | राज्य शासन |
| बाल कल्याण अधिकारी | प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये | पोलीस उपायुक्त/ पोलीस अधीक्षक |
| एस जे पी यु मधील दोन सामाजिक कार्यकर्ते | जिल्हा | राज्य शासन |

*** टीप : राज्य शासन याचा अर्थ, बाल संरक्षणाशी संबंधित असणारा राज्य शासनाचा संबंधित विभाग, असा आहे. काही राज्यांमध्ये, तो महिला व बाल विकास विभाग असतो तर, अन्य काही राज्यांमध्ये, तो समाज कल्याण / सामाजिक न्याय विभाग असतो.**

बाल न्याय अधिनियमान्वये, काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या (सीएनसीपी) संबंधात सक्षम प्राधिकरण म्हणून बाल कल्याण समितीची, आणि कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या (सीसीएल) प्रकरणे निकालात काढण्यासाठी अंतिम प्राधिकरण म्हणून बाल न्याय मंडळाची स्थापना केली आहे.

### ३. केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण (CARA):

केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण (सीएआरए) ही, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ याच्या कलम ६८ अन्वये गठित केलेली भारत सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालयाची एक वैधानिक संस्था आहे. ती, भारतीय बालकांच्या विकासासाठी नोडल संस्था म्हणून काम करते आणि देशांतर्गत व आंतर-देशीय दत्तक प्रक्रीयेतील संनियंत्रण व विनियमन करणे अनिवार्य करते. केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण (सीएआरए) ची, केंद्र शासनाने २००३ मध्ये पुनरुज्जीवीत केलेल्या हेग अधिवेशनातील आंतर-देशीय दत्तक अभिसंधी, १९९३ च्या तरतुदीनुसार आंतर-देशीय दत्तक संबंधी कार्यवाही करण्यासाठी केंद्रीय प्राधिकरण म्हणून रचना केलेली आहे. केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण (CARA), प्रामुख्याने तिच्या सहयोगी / मान्यताप्राप्त दत्तक अभिकरणांमार्फत (एजन्सी), अनाथ, तिरस्कृत / परित्याग केलेल्या व सोडून दिलेल्या बालकांच्या दत्तक संबंधी कार्यवाही करते.

### (क) १. लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा ( पोक्सो ) अधिनियम, २०१२

लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ हा, लैंगिक दुर्वर्तन व पिळवणूक यापासून बालकांचे संरक्षण करण्याच्या कायदेशीर तरतुदी बळकट करतो. प्रथमच बालकांविरुद्धच्या लैंगिक गुन्ह्यांच्या समस्येचे निवारण करण्यासाठी एक विशेष कायदा संमत करण्यात आलेला आहे. बालकांच्या लैंगिक शोषणा संबंधी गुन्हे हे, भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहे. भारतीय दंड संहितेमध्ये, बालकांविरुद्धच्या सर्व प्रकारच्या लैंगिक शोषणाविरुद्ध तरतूद नाही आणि त्यामध्ये प्रौढ व बाल पीडित व्यक्ती यांच्यामध्ये वर्गीकरण केलेले नाही.

लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ मध्ये, बालकाची, १८ वर्षे वया खालील कोणतीही व्यक्ती अशी व्याख्या केलेली आहे आणि बालकांचे लैंगिक छळवणूक, छेडछाड, अश्लीलता, कुकर्म, अत्याचार, बलात्कार, ह्या गुन्ह्यांपासून १८ वर्षे वयाखालील सर्व बालकांचे संरक्षण व्हावे, ह्या उद्देशाने हा विशेष कायदा अस्तित्वात आला आहे.

या अधिनियमामध्ये बालकांविरुद्धचे पाच लैंगिक गुन्हे निश्चित केले आहे - लैंगिक बलात्कार, भेदक लैंगिक शोषण, तीव्र लैंगिक शोषण, लैंगिक अत्याचार, लहान मुलांचा अश्लीलतेसाठी वापर करून घेणे होय. ह्या गुन्ह्यांचे अवप्रेरण अथवा प्रयत्न करणे ही देखील दंडनीय बाब मानली जाते. या अधिनियमाखालील अपराधांची न्यायचौकशी करण्यासाठी विशेष न्यायालय म्हणून प्रत्येक जिल्ह्यामध्ये सत्र न्यायालय स्थापन करण्यासाठी या अधिनियमान्वये राज्य सरकारांना अनिवार्य केले आहे. तथापि, जर एखाद्या जिल्ह्यामध्ये, बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ या खालील बाल न्यायालय किंवा तस्तम प्रयोजनासाठी विशेष न्यायालय अधिसूचित करण्यात आलेले असेल तर, ते न्यायालय या अधिनियमाखालील अपराधांची न्याय चौकशी करेल.

लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ च्या कलम ४४ आणि लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण नियम, २०१२ चा नियम ६ अन्वये, राष्ट्रीय व राज्य बाल हक्क संरक्षण आयोगांना आणखी पुढील अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेतः-

अ. लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ च्या अंमलबजावणीचे सनियंत्रण करणे;

ब. राज्य सरकारांनी विशेष न्यायालय स्थापन केल्याचे सनियंत्रण करणे;

क. राज्य सरकारांनी सरकारी अभियोक्त्यांची नियुक्ती केल्याचे सनियंत्रण करणे;

ड. बालकांना सहाय्य करण्यासाठी न्यायचौकशी-पूर्व व न्याय चौकशीच्या टप्प्यावर संलग्न असलेल्या अशासकीय संस्था, व्यावसायिक व तज्ञ किंवा मानसशास्त्र, सामाजिक कार्य, शारीरिक आरोग्य, मानसिक आरोग्य व बाल विकास यांमधील ज्ञान असणाऱ्या व्यक्ती यांचा वापर करण्यासाठी राज्य शासनाद्वारे या अधिनियमाच्या कलम ३९ मध्ये नमूद केलेली मार्गदर्शक तत्वे तयार करण्याचे सनियंत्रण करणे आणि ही मार्गदर्शक तत्त्वे लागू करण्याचे सनियंत्रण करणे;

इ. या अधिनियमाखालील आपली कामे प्रभावीपणे पार पाडण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांसह पोलीस कर्मचाऱ्यांना व अन्य संबंधित व्यक्तींना स्वतंत्र प्रशिक्षण नियामक तयार करण्याचे व त्याची अंमलबजावणी करण्याचे सनियंत्रण करणे;

फ. या अधिनियमाच्या तरतुदींची, सर्वसामान्य जनता, बालके तसेच त्यांचे माता-पिता व पालक यांच्यामध्ये जाणीव, जागृती व्हावी यादृष्टीने, या अधिनियमाशी संबंधित असणाऱ्या तरतुदींची माहिती, दूरदर्शन, रेडिओ व मुद्रित माध्यम यांसह सर्व माध्यमांमार्फत प्रसारित करण्यासाठी केंद्र शासन व राज्य शासन यांचे सनियंत्रण करणे व त्यांना सहाय्य करणे;

ग. बाल कल्याण समितीच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या बालकाच्या लैंगिक शोषणाच्या कोणत्याही विशिष्ट प्रकरणाबाबत अहवाल मागविणे;

ह. पुढील माहितीसह, लैंगिक दुरुपयोगाची कळविलेली प्रकरणे व या अधिनियमांच्या तरतुदींप्रमाणे प्रस्थापित केलेल्या प्रक्रियेनुसार बालकांच्या लैंगिक शोषणाबाबत नोंदवल्या गेलेल्या प्रकरणांची व त्यांच्या निकालाबाबतची माहिती ( Data ) आयोग स्वतः अथवा संबंधित प्रतिनिधींमार्फत मागवून त्यामध्ये निम्नलिखित मुद्द्यांचा समावेश असेलः-

i. या अधिनियमान्वये नोंदवलेल्या गुन्ह्यांची संख्या व तपशील;

ii. या अधिनियमान्वये व नियमान्वये विहित केलेल्या कार्यपद्धतीचे संबंधित कालमर्यादेत, पालन केले होते किंवा कसे;

iii. आकस्मिक वैद्यकीय शुश्रूषा व वैद्यकीय तपासणी यांची व्यवस्था करण्यासह, या अधिनियमाखालील गुन्ह्यांच्या बळी पडलेल्या व्यक्तींची शुश्रूषा व संरक्षण व्यवस्थांचा तपशील; कोणत्याही विशिष्ट प्रकरणी, संबंधित बाल कल्याण समितीने, एखाद्या बालकांची काळजी व

iv. संरक्षण करण्याच्या गरजेचे मूल्यांकन करण्यासंबंधीचा तपशील.

क्ष. या अधिनियमाच्या तरतुदींच्या अंमलबजावणीचे मूल्यांकन करणे आणि आपल्या वार्षिक अहवालातील एक स्वतंत्र प्रकरणांमध्ये सदर विषयावर अहवाल संसदेला सादर करणे.

२. **लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ याखालील प्रमुख प्राधिकरणे –**

| | |
|---|---|
| पोलीस/ विशेष बाल पोलीस युनिट | • माहिती नोंदवणे<br>• प्राथमिक मूल्यांकन<br>• २४ तासांच्या आत प्रकरणची नोंद करणे<br>• आवश्यक असल्यास, २४ तासांच्या आत बाल कल्याण समिती समोर सादर करणे<br>• बालकाच्या वैद्यकीय गरजेकडे लक्ष देणे<br>• माता-पित्यांना / पालकांना माहिती देणे |
| बाल कल्याण समिती | • आवश्यक असल्यास, बालकास बालगृहात वगैरे दाखल करणे<br>• सहाय्यक व्यक्ती उपलब्ध करून देणे |
| जिल्हा बाल संरक्षण युनिट | • नोंदवही ठेवणे व ती अधिकारी यांना उपलब्ध करून देणे<br>• दुभाषिकांच्या/ अनुवादकाच्या सेवेसाठी रक्कम प्रदान करणे |
| न्याय दंडाधिकारी | • जबाब नोंदवणे |
| विशेष न्यायालय/ न्यायाधीश | • इन कॅमेरा न्याय चौकशी करणे<br>• बालस्नेही वातावरण सुनिश्चित करणे<br>• बालकाचा स्वाभिमान जपणे<br>• बालकाची गोपनीयता राखणे (नाव उघड न करणे)<br>• बालकाचा साक्षपुरावा ३० दिवसांच्या आत नोंदविणे<br>• १ वर्षाच्या आत न्यायचौकशी पूर्ण करणे |
| विशेष सरकारी अभियोक्ता | • प्रकरणांचा अभियोग, केवळ या अधिनियमाखाली चालविणे |
| सहाय्यभूत व्यक्ती | • गोपनीयता राखणे<br>• माता-पित्यांना / पालकांना माहिती देणे<br>• न्यायिक प्रक्रियेतील त्याची/ तिची भूमिका बालकाला समजावून सांगणे |
| केंद्र शासन | • अधिनियमास प्रसिद्धी देणे<br>• अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे<br>• नियम व मार्गदर्शक सूचना तयार करणे<br>• या अधिनियमांच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना ज्या अडचणी उद्‌भवतील त्या अडचणी दूर करण्यासाठी या अधिनियमाच्या प्रारंभापासून दोन वर्षांच्या आत, म्हणजेच १३ नोव्हेंबर,२०१४ च्या आत आदेश पारित करणे |

| | |
|---|---|
| राज्य शासन | • विशेष न्यायालय म्हणून एखाद्या न्यायालयास पदनिर्देशित करणे<br>• विशेष सरकारी अभियोक्त्याची नियुक्ती करणे<br>• अधिनियमास प्रसिद्धी देणे<br>• अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे<br>• नियम व मार्गदर्शक सूचना तयार करणे |
| राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग व राज्य बाल हक्क संरक्षण आयोग | • अधिनियमाच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे<br>• विशिष्ट प्रकरणांबाबत बाल कल्याण समितीकडून अहवाल मागवणे<br>• आपल्या वार्षिक अहवालातील स्वतंत्र प्रकरणाद्वारे अधिनियमाच्या अंमलबजावणीबाबत अहवाल सादर करणे |

**ड) लैंगिक गुन्ह्यापासून बालकांचे संरक्षण कायदा सुधारणा (पोक्सो) २०१९ यावर टिपण –**

लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण कायदा, २०१२ यामध्ये २०१९ साली सुधारणा करून त्यामधील अपराधांसाठी अधिक कडक शिक्षा केली गेली आहे. त्यामध्ये बालकांवर लैंगिक अपराध केल्यास मृत्यूदंडाच्या शिक्षेचा ही समावेश आहे. याचा उद्देश बालकांविरुद्ध असे अपराध होणे थांबवणे व अपराध्यांना कठोर शासन व्हावे असा आहे. २०१९ च्या सुधारणा कायद्यामध्ये संभोग चित्रिकरणाकरिता/ संभोग वर्णन करिता बालकांचा वापर (चाईल्ड पोर्नोग्राफी) याला प्रतिबंध घालण्यासाठी दंड व तुरुंगवास अशा शिक्षेची तरतूद आहे सदर २०१९ चे सुधारणा विधेयक दि.१८ जुलै, २०१९ रोजी राज्यसभेत सादर झाले व त्याला राज्यसभेत दि.२४ जुलै, २०१९ मध्ये मंजुरी दिली .लोकसभेने त्याला दि.०१.०८.२०१९ रोजी मंजुरी दिली. सदर सुधारणा भारताच्या राजसत्रात दि.६ ऑगस्ट, २०१९ रोजी अधिसूचित केली गेली व दि. १६ ऑगस्ट, २०१९ रोजी अंमलात आली.

**या लैंगिक गुन्ह्या बालकांचे संरक्षणा (सुधारणा) कायदा, २०१९ च्या महत्त्वाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे**

➢ **अंतर्भेदी लैंगिक हल्ला –**

पोक्सो कायदा, २०१२ च्या कलम ४ मधील प्रावधानामध्ये अंतर्भेदी लैंगिक हल्ला झाल्यास शिक्षेबाबत तरतूद आहे. २०१९ च्या सुधारणेनुसार याबाबतचा तुरुंगवास ७ वर्षांपासून वाढवून १० वर्षे केला आहे. सदर शिक्षा जन्मठेप व दंड अशीही वाढू शकते.

तसेच पुढे असेही दिले आहे की, जर पीडीत व्यक्तींचे वय १६ वर्षांखाली असेल तर सदर शिक्षा किमान २० वर्षे तुरुंगवास ते जन्मठेप अशी होऊ शकते व दंड ही केला जाऊ शकतो. सदर दंड हा पीडीत व्यक्तीच्या वैद्यकीय खर्चासाठी व पुनर्वसनासाठी वापरला जाऊ शकतो.

➢ **विकोपकारी अंतर्भेदी लैंगिक हल्ला –**

पोक्सो कायदा, २०१२ च्या कलम ४ मध्ये काही कृतींना विकोपकारी अंतर्भेदी लैंगिक हल्ला असे म्हटले आहे. यामध्ये जेव्हा एखादा पोलीस अधिकारी, सशस्त्र दलाचा सदस्य किंवा सार्वजनिक सेवक किंवा अन्य लहान मुलावर अंतर्भेदी लैंगिक हल्ला करतो त्याबाबतीत तरतुदी दिल्या आहेत. त्याचप्रमाणे जेव्हा हल्ला करणारी व्यक्ती सदर बालकाचे नातेवाईक असतील किंवा सदर लैंगिक हल्ल्यामध्ये बालकाच्या लैंगिक अवयवांना इजा पोचते किंवा बालक गर्भवती होते त्या बाबतही तरतूद केली आहे. या सुधारणा नुसार या व्याख्येमध्ये अधिक गोष्टी जोडल्या गेल्या आहेत.

१) अशा लैंगिक हल्ल्यामध्ये बालकाचा मृत्यू होणे.

२) नैसर्गिक संकटे व हिंसेच्या वातावरणात केलेला लैंगिक हल्ला.

या २०१९ च्या दुरुस्तीनुसार अशा विकोपकारी अंतर्भेदी लैंगिक हल्ल्याबद्दलची शिक्षा सध्याच्या "१० वर्षे ते जन्मठेप व दंड" या शिक्षेपासून "२० वर्षांपेक्षा कमी नाही इतक्या काळासाठी सश्रम कारावास की जो जन्मठेपेमध्ये रुपांतरित होऊ शकतो आणि दंड किंवा मृत्यूदंड (पोक्सो कायदा, २०१२ च्या कलम ६ नुसार). सदर दंड हा पीडीत व्यक्तींचे वय १६ वर्षांखाली असेल तर सदर शिक्षा किमान २० वर्षे तुरुंगवास ते जन्मठेप अशी होऊ शकते व दंड ही केला जाऊ शकतो. सदर दंड हा पीडीत व्यक्तीच्या वैद्यकीय खर्चासाठी व पुनर्वसनासाठी वापरला जाऊ शकतो.

- **लैंगिक हल्ला –**

पोक्सो कायदा, २०१२ च्या कलम ७ नुसार जर एखाद्या व्यक्तीने लैंगिक हेतूने एखाद्या मुलाच्या / मुलीच्या योनीला / लिंगाला, गुदद्वाराला किंवा स्तनांना स्पर्श करणे (की ज्यात प्रवेशन होत नाही) पोक्सो कायदा, २०१२ च्या कलम ९ मध्ये विकोपकारी लैंगिक हल्ला याची व्याख्या दिली आहे. त्यामध्ये जेव्हा एखादा पोलीस अधिकारी, सशस्त्र दलाचा सदस्य किंवा सार्वजनिक सेवक किंवा अन्य एखादा बालकावर लैंगिक हल्ला करतो / करते त्याबाबतच्या तरतुदी दिल्या आहेत. त्यामध्ये २०१९ च्या सुधारणेनुसार दोन आणखी बाबी जोडल्या गेल्या आहेत. १) जातीय किंवा वांशिक तरतुदी दंगलीच्या वेळी किंवा कोणत्याही नैसर्गिक संकटाच्या वेळी लैंगिक हल्ला केला जातो. २) एखाद्या बालकाला लैंगिक परिपक्वता लवकर यावी यासाठी त्याला / तिला कोणतेही संप्रेरक (हार्मोन) किंवा अन्य रसायन देणे किंवा त्यासाठी मदत करणे.

- **संभोगवर्णन / संभोग दर्शनाच्या हेतूसाठी –**

`सुधारणा कायदा, २०१९ मध्ये बाल संभोग दर्शन / संभोग वर्णन यांची व्याख्या अशी दिली आहे. त्यानुसार बाल संभोग दर्शन / बाल संभोग वर्णन म्हणजे अशा कोणत्याही लैंगिक वर्तणुकीचे स्पष्ट दृश्य पद्धतीने चित्रिकरण / रेखाटन की ज्यामध्ये एखाद्या बालकाचा सहभाग आहे. यामध्ये फोटोग्राफ, चित्रफीत (व्हीडीयो) डिजीटल किंवा संगणकाद्वारे निर्माण केलेली प्रतिमा की जी प्रत्यक्ष एखाद्या बालकापासून वेगळी दर्शविता येत नाही. तसेच एखादी तयार केलेली स्वीकृत केलेली किंवा बदललेली प्रतिमा जी एखाद्या बालकाचे रेखाटन/चित्रीकरण वाटते (पोक्सो कायदा, २०१२ च्या कलम २ (डअ). २०१९ च्या सुधारणा कायद्यानुसार बालकांचा उपयोग संभोग दर्शन/संभोग वर्णनासाठी करणे हे आता शिक्षेला पात्र आहे. ही शिक्षा किमान १५ वर्षे तुरुंगवास व दंड अशी आहे. हाच गुन्हा पुन्हा केला तर ही शिक्षा ७ वर्षे तुरुंगवास व दंड अशी आहे. त्याचप्रमाणे २०१९ च्या सुधारणा कायद्यानुसार काही गुन्ह्यांसाठी तक्ता एक मध्ये दिल्याप्रमाणे शिक्षा वाढवली आहे.

**तक्ता १ – संभोग दर्शन / संभोग वर्णन यासाठी बालकाचा वापर करण्यासाठी शिक्षा –**

| गुन्हा | पोक्सो कायदा, २०१२ नुसार | पोक्सो सुधारणा कायद्यानुसार |
|---|---|---|
| बालकांचा संभोग दर्शनासाठी/ संभोग वर्णनासाठी वापर करणे | जास्तीत जास्त ५ वर्षे तुरुंगवास | कमीत कमी ५ वर्षे तुरुंगवास |
| बालकांचा अशा संभोग दर्शनासाठी/ संभोग वर्णनासाठी वापर की ज्याचा निकाल अंतर्भेदी लैंगिक हल्ल्यामध्ये होतो | किमान १० वर्षे, कमाल जन्मठेप | किमान १० वर्षे (जर संबंधित बालक १६ वर्षांपेक्षा कमी वयाचा असेल तर किमान २० वर्षे) |
| बालकांचा अशा संभोग दर्शनासाठ / संभोग वर्णनासाठी वापर की ज्याचा निकाल विकोपकारी अंतर्भेदी लैंगिक हल्ल्यामध्ये होतो | जन्मठेप | किमान- २० वर्षे तुरुंगवास कमाल - जन्मठेप किंवा मृत्यूदंड |
| बालकांचा अशा संभोग दर्शनासाठी / संभोग वर्णनासाठी वापर की ज्याचा निकाल लैंगिक हल्ल्यामध्ये होतो | किमान - ६ वर्षे तुरुंगवास<br>कमाल - ८ वर्षे तुरुंगवास | किमान - ३ वर्षे तुरुंगवास<br>कमाल - ५ वर्षे तुरुंगवास |
| बालकांचा अशा संभोग दर्शनासाठी / संभोग वर्णनासाठी वापर की ज्याचा निकाल विकोपकारी अंतर्भेदी लैंगिक हल्ल्यामध्ये होतो | किमान - ८ वर्षे तुरुंगवास<br>कमाल - १० वर्षे तुरुंगवास | किमान - ५ वर्षे तुरुंगवास<br>कमाल - ७ वर्षे तुरुंगवास |

**टीप – संभोग दर्शन / संभोग वर्णनासाठी बालकांचा वापर की ज्याचा निकाल कोणत्याही तऱ्हेच्या लैंगिक हल्ल्यामध्ये होतो यासाठीची शिक्षा ही संभोग दर्शन / संभोग वर्णनासाठी बालकांचा वापर करण्याची जी शिक्षा आहे त्यासाठीच्या किमान ५ वर्षे या शिक्षेमध्ये मिळवून भोगण्याची आहे.**

➢ पोक्सो कायदा, २०१२ च्या कलम १५ च्या तरतुदीनुसार जी व्यक्ती कोणत्याही अशा प्रकारचे संभोग दर्शन / संभोग वर्णन असलेल्या बाबी / गोष्टी की ज्यामध्ये बालकांचा सहभाग आहे ते साठवतो किंवा त्याच्या / तिच्या अशा बाबी / गोष्टी आहेत परंतु अशी व्यक्ती त्या नष्ट करण्यात अपयशी ठरतो किंवा प्राधिकाऱ्यांना कळवण्यामध्ये अपयशी होतो व ज्या व्यक्तीचा हेतू सदर गोष्टी / बाबी शेअर करण्याचा आहे किंवा सदर बाबी प्रक्षेपित करण्याचा आहे अशा व्यक्तीला रु. ५,०००/- पेक्षा कमी नाही इतका दंड भरावा लागेल व पुन्हा हाच गुन्हा त्याने केला तर त्याला दहा हजार रुपये दंड भरावा लागेल.

➢ सुधारणा कायदा, २०१९ नुसार जी व्यक्ती बालकांचा सहभाग असलेल्या संभोग दर्शन / संभोग वर्णन असलेल्या बाबी / गोष्टी साठवतो किंवा आपल्या ताब्यात ठेवतो किंवा कोणत्याही न्यायालयात अहवाल करण्याखेरीज किंवा पुरावा म्हणून सादर करणे या खेरीज कोणत्याही कारणासाठी त्याचे प्रक्षेपण करतो, वितरण करतो किंवा प्रसार करतो त्या व्यक्तीला कोणत्याही तऱ्हेचा ३ वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्ही या शिक्षा होऊ शकतात.

➢ सुधारणा कायदा, २०१९ नुसार जी व्यक्ती वाणिज्यिक कारणासाठी बालकांचा सहभाग असलेल्या संभोग दर्शन / संभोग वर्णन असलेल्या बाबी / गोष्टी साठवतो किंवा आपल्या ताब्यात ठेवतो त्या व्यक्तीला कोणत्याही ३ वर्षे ते ५ वर्षे या मुदतीसाठी कोणत्याही तऱ्हेचा तुरुंगवास आणि दंड किंवा दोन्ही त्याचबरोबर सुधारणा कायदा, २०१९ मध्ये बालकांचा सहभाग असलेल्या संभोग दर्शन / संभोग वर्णन असलेल्या गोष्टींचा / वस्तूंचा साठा करण्याबाबतचे दोन गुन्हे समाविष्ट केले आहेत. १) बालकांचा सहभाग असलेले संभोग दर्शन / संभोग वर्णन असलेल्या गोष्टी नष्ट करणे, गाळून टाकणे किंवा त्याचा अहवाल पाठवणे यामध्ये अपयशी होणे २) अशा तऱ्हेच्या गोष्टी / बाबी अहवाल पाठवण्याखेरीज अन्य तऱ्हेने ते वितरण करणे, त्याचे प्रदर्शन करणे, संप्रेषित करणे.

## प्रकरण ६ :- मा. अध्यक्षा व सदस्या यांनी केलेले उपक्रम व कार्य :-

**अ. महाराष्ट्रातील बालकांची देखभाल करणाऱ्या संस्था व कर्मचाऱ्यांसाठी कोव्हीड १९ च्या दरम्यान महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने एप्रिल २०२० मध्ये जारी केलेले दिशानिर्देश**

कोव्हीड १९ मध्ये भेद्य बालकांच्या विशेष देखभाल व संरक्षणासाठी राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाने जारी केलेल्या दिशानिर्देशानुसार आणि माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ३ एप्रिल २०२० रोजीच्या आदेश क्रमांक ४ मधील निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने इंग्लिश आणि मराठी मध्ये दिशानिर्देश जारी केले होते.

देखभाल आणि संरक्षणाची गरज असणाऱ्या आणि विधीसंघर्षित सर्व बालकांच्या कल्याणाची आणि त्यांना सर्व सुविधा उपलब्ध असल्याची आयोगाने खातरजमा केली. बालकांची देखभाल करणाऱ्या राज्यातील विविध संस्थांमध्ये असलेल्या बालकांमध्ये कोरोना विषाणूचा प्रसार न होण्यासाठी प्रतिसादात्मक कार्यवाहीचे नियोजन तसेच त्याचा प्रसार मर्यादित ठेवण्यासाठी आवश्यक असे आचरण व वर्तनाच्या निकषांचे पालन करण्याची गरज असल्याचे निरीक्षण आयोगाने नोंदविले आहे.

**बालकांची देखभाल करणाऱ्या व काळजी घेणाऱ्या महाराष्ट्रातील संस्था व त्यांच्या कर्मचाऱ्यांना बालकांच्या हिताबाबत महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने खालील मुद्द्यांवर सूचना केल्या आहेत :**

**१.** महाराष्ट्र राज्यामध्ये हालचालींवर प्रतिबंध शिथिल करण्याबाबत पुढील निर्देश जारी होईपर्यंत भेटी मर्यादित ठेवणे .

**२.** वारंवार स्थलांतर करणाऱ्या कुटुंबांच्या सोबत असणारी, रस्त्यावर / बालकांची देखभाल करण्याची जबाबदारी सुपूर्द केलेल्या संस्थांमध्ये असणारी, वसतिगृहे, हॉटेल, मदरसे, शासकीय / सार्वजनिक निवासी संस्थांमध्ये वास्तव्य करणाऱ्या बालकांच्या सुरक्षितता व संरक्षणासाठी नवी दिल्ली येथील राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाने दिनांक २९ मार्च २०२० रोजी दिशानिर्देश जारी केले आहे. संरक्षणाची गरज असणाऱ्या अधिकारक्षेत्रातील बालकांना निर्धारित करण्यासाठी बालक कल्याण पोलीस अधिकाऱ्यांची भूमिका व कर्तव्ये, संरक्षणाची खातरजमा करण्याची प्रक्रिया, पालकांसोबत स्थलांतर करणाऱ्या व वसतिगृहे किंवा निवासी संस्था रिक्त करण्याचे निर्देश दिलेल्या बालकांना संरक्षण देण्याची प्रक्रिया आणि दिशानिर्देश, बालक कल्याण समिती, पोलीस विशेष बाल अधिकारी यांची भूमिके बाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे. सदर दिशानिर्देशांची एक प्रत त्वरित अनुपालनासाठी आणि योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडण्यात आली आहे.

**३.** माननीय सर्वोच्च न्यायालयाने बाल संरक्षणगृहात कोव्हीड १९ विषाणू न पसरण्यासाठी दाखल केलेल्या दिवाणी रिट अर्ज क्रमांक ४ / २०२० – दिवाणी रिट अर्ज क्रमांक ४ / २०२० मध्ये दिनांक ३ एप्रिल २०२० रोजी स्वाधिकारे जारी केलेल्या निर्देशानुसार कोव्हीड १९ महासाथीच्या कालावधीत बाल न्याय ( देखभाल व संरक्षण ) अधिनियम २०१५ अन्वये देखभाल व संरक्षणाची गरज असणाऱ्या व विधीसंघर्षित बालकांचे हित जपण्यासाठी दिशानिर्देश जारी केले आहेत. कोव्हीड महासाथीच्या कालावधीत बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांमधील बालकांमध्ये कोव्हीड विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी व त्याची बाधा न होण्यासाठी बाल न्याय मंडळ, बालकल्याण समित्या आणि बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांनी हाती घ्यावयाच्या प्रतिबंधात्मक, परीचालानात्मक व प्रतिसादात्मक कार्यवाहीबाबत विनिर्दिष्ट दिशानिर्देश माननीय सर्वोच्च न्यायालयाने विहित केले आहेत. सदर आदेशांत बालकांच्या कल्याणासाठी नमूद केलेल्या सर्व उपाययोजना तातडीने लागू करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत. सदर दिशानिर्देशांची एक प्रत त्वरित अनुपालनासाठी आणि योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडण्यात आली आहे

**४.** माननीय सर्वोच्च न्यायालयाने बाल संरक्षणगृहात कोव्हीड १९ विषाणू न पसरण्यासाठी दाखल केलेल्या दिवाणी रिट अर्ज क्रमांक ४ / २०२० – दिवाणी रिट अर्ज क्रमांक ४ / २०२० मध्ये दिनांक ३ एप्रिल २०२० रोजी स्वाधिकारे जारी केलेल्या निर्देशानुसार कोव्हीड १९ मुळे आलेल्या ताणतणावाच्या परिणामी बालकांमध्ये असंबद्ध वर्तणूक / हालचाल आढळून आल्यास संबंधित कर्मचाऱ्यांनी पर्याप्त काळजी घेतली पाहिजे. जी बालके अगोदरच मानसिक ताणतणावातून गेली असतील त्यांच्याबाबतीत हे अधिकच खरे आहे. अशा बालकांना समुपदेशन व विशेष स्वरूपाच्या देखभालीची गरज असते. बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांमधील बालकांच्या आरोग्याची स्थिती तपासण्यासाठी संबंधित संस्थेशी संलग्न निवासी अथवा अन्य डॉक्टरांनी संस्थेतील बालकांची आठवड्यातून दोन वेळा तपासणी करावी.

**५.** बालके घाबरून जाणार नाहीत अशा पद्धतीने चालू असलेल्या महासाथीबाबत बालकांमध्ये जागरूकता निर्माण करावी.

**६.** बालक केन्द्री आणि सृजनात्मक पद्धतीने व्यक्तिगत आरोग्य राखण्याबाबत बालकांना शिक्षित करावे. वीस सेकंद हात धुण्याची सवय मुलांना लावावी .

७. बालके अर्थपूर्ण रीतीने गुंतून राहण्यासाठी त्यांच्या दैनंदिन दिनचर्येची आखणी करा.

८. बालकांची खेळण्याची जागा, सामाईक शयनगृहे आणि स्वच्छतागृहापुरती स्वच्छता मर्यादित न ठेवता संस्थेच्या संपूर्ण परिसराचे निर्जंतुकीकरण करावे .

९. सदर कालावधीत संस्थेत आणण्यात येणाऱ्या सर्व बालकांची पर्याप्त देखभाल व समुपदेशन करण्यात यावे.

१०. बालकांसाठी सुरक्षित पर्याप्त आणि आरामदायक विलगीकरणाचे सीमांकन व संस्थेतील कर्मचाऱ्यांसाठी समुपदेशनाच्या सुविधा उपलब्ध करून देणे.

संरक्षणाची गरज असणाऱ्या अधिकारक्षेत्रातील बालकांना निर्धारित करण्यासाठी बालक कल्याण पोलीस अधिकाऱ्यांची भूमिका व कर्तव्ये, संरक्षणाची खातरजमा करण्याची प्रक्रिया, पालकांसोबत स्थलांतर करणाऱ्या व वसतिगृहे किंवा निवासी संस्था रिक्त करण्याचे निर्देश दिलेल्या बालकांना संरक्षण देण्याची प्रक्रिया आणि दिशानिर्देश , बालक कल्याण समिती, पोलीस विशेष बाल अधिकारी यांची भूमिके बाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे. महासाथीच्या बाबत घडणाऱ्या घडामोडीबाबत सावध राहण्याची आणि बालकांची देखभाल करणाऱ्या संस्था सुरक्षित ठेवण्यासाठी त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी पर्याप्त कार्यवाही करणे आवश्यक आहे. आरोग्य विभागाने सामाजिक विलागीकरण व निर्जंतुकीकरण याबाबत दिलेल्या सूचनांचे पालन यामध्ये समाविष्ट आहे.

## "ब" आयोगातर्फे घेण्यात आलेले विविध ऑनलाइन वेबिनार :-

| अ. क्र. | दिनांक | वेबिनार विषय | सहभाग |
|---|---|---|---|
| १ | २३,२४, आणि २५ एप्रिल २०२० | कोविड-१९ महामारीच्या काळात चाइल्ड केअर इन्स्टिट्यूशन (CCIS) मध्ये व्हायरसचा प्रसार रोखण्यासाठी प्राधान्याने उपाययोजना करणे आवश्यक आहे | महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग आणि महाराष्ट्राच्या बाल कल्याण समित्या यांच्यातील व्हिडिओ कॉन्फरन्स कॉल महाराष्ट्र राज्यातील CWC, प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी (DWCDO) आणि जिल्हा बाल संरक्षण युनिट्सचे प्रतिनिधी (DWCDO) उपस्थित होते. DCPUs).<br>२३ एप्रिल विभाग<br>२४ एप्रिल कोकण आणि पुणे विभाग नाशिक आणि नागपूर<br>२५ एप्रिल - औरंगाबाद आणि अमरावती विभाग |
| २ | १३ मे, २०२० | "बालकांचा ऑनलाईन पद्धतीने होणारा लैंगिक छळ थांबवण्यासाठी धोरणात्मक बाबींची अंमलबजावणी करणे" | माननीय मंत्री महोदय, महिला व बालविकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग. व इंटरनॅशनल जस्टीस मिशन या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने वेबिनार आयोजित करण्यात आले होते.<br>सदर चर्चासत्रामध्ये (वेबिनार) महिला व बालविकास विभागाचे प्रतिनिधी तसेच विविध राज्यातील बाल हक्क संरक्षण आयोगाचे सदस्य, राज्य महिला आयोगाचे सदस्य, मानवी हक्क आयोगाचे सदस्य, शालेय शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी, न्यायिक सदस्य, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेचे प्रतिनिधी, धोरणकर्ते, सामाजिक संस्थेचे प्रतिनिधी असे जवळपास एकूण तीनशे मान्यवर उपस्थित होते. |
| ३ | २९ मे २०२० | कोरोना विषाणू संसर्गामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागाशी संबंधित विषयाबाबत चर्चा करण्यासाठी सदर ऑनलाईन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. | मा. सचिव महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई यांचे सूचनेनुसार दिनांक २९-०५-२०२० रोजी दृकश्राव्य माध्यमाद्वारे शालेय शिक्षण विभागासोबत एकत्रित बैठक आयोजित घेण्यात आली.<br>कोरोना विषाणू संसर्गजन्य परिस्थितीमुळे पालक, विद्यार्थी या सर्वांच्या मनात अनेक प्रश्न आहेत. याबाबत आयोगास संपर्क करतात प्रामुख्याने इयत्ता १० वी इ. १२ वीच्या विद्यार्थ्यांचे झालेल्या परीक्षेचे पेपर तपासणे निकाल जाहीर करणे शाळा कधी सुरु होणार आहेत. काही देशांमध्ये प्राथमिक शाळा अगोदर सुरु होणार आहेत. व माध्यमिक नंतर तर काही देशात माध्यमिक शाळा अगोदर व प्राथमिक शाळा नंतर सुरु होणार आहेत. शाळा ऑनलाईन सुरू होणार वा प्रचलित पद्धतीने सुरु होणार तसेच शाळा सुरु झाल्यानंतर midday meal चे आयोजन कसे होणार आर टी ई (RTE) प्रवेश प्रक्रियेची यावर्षीची सद्यस्थिती याबाबत विभागाचे नियोजन पूर्वतयारी याबाबत चर्चा करण्यात आली. |

| अ. क्र. | दिनांक | वेबिनार विषय | सहभाग |
|---|---|---|---|
| ४ | १० जून, २०२० | केरळ सायबरडोम पोलीस आणि महाराष्ट्र सायबर पोलीस यांच्याशी झूम मीटिंग, महाराष्ट्र बाल हक्क आयोग आणि आंतरराष्ट्रीय न्याय मिशन द्वारे सुलभ मुलांच्या ऑनलाइन लैंगिक शोषणाचा सामना करण्यासाठी सर्वोत्तम पद्धतींवर. | १ . श्री. मनोज अब्राहम-एडीजी, नोडल अधिकारी, केरळ सायबरडोम पोलीस.<br>२. श्री. एस. श्रीजीथ आयजी सायबर क्राइम, केरळ,<br>३. श्री. सचिन पांडकर एसपी सायबर सेल महाराष्ट्र,<br>४. कु. सीमा व्यास सदस्य सचिव, एमएससीपीसीआर,<br>५. श्रीमती. मेलिसा वालावलकर, संचालन संचालक, आंतरराष्ट्रीय न्याय मिशन,<br>६. श्री. येसुदास नायडू, प्रमुख, भागीदारी विकास,<br>७. आयोगाचे प्रतिनिधी, IJM आणि सायबर सेल महाराष्ट्र |
| ५ | १६ जून, २०२० | 'महाराष्ट्रातील बालगृहे / बाल निरीक्षण गृहे यांचे करिता ऑनलाईन प्रशिक्षण कार्यशाळा | माननीय मंत्री महोदय, महिला व बालविकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग. व इंटरनॅशनल जस्टीस मिशन या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने वेबिनार आयोजित करण्यात आले होते. सदर ऑनलाईन प्रशिक्षण कार्यशाळेस महिला व बालविकास विभागाचे प्रतिनिधी, आरोग्य विभागाचे प्रतिनिधी, शालेय शिक्षण विभागाचे प्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे सदस्य, सदस्य सचिव, अधिकारी कर्मचारी, धोरणकर्ते, 'इंटरनॅशनल जस्टीस मिशन संस्थेचे प्रतिनिधी, विषय तज्ञ, बाल कल्याण समिती चे अध्यक्ष / सदस्य, महाराष्ट्रातील बालगृहे / बाल निरीक्षण गृहांचे अधिक्षक असे जवळपास एकूण पाचशे पन्नास हुन अधिक मान्यवर उपस्थित होते. |

| अ. क्र. | दिनांक | वेबिनार विषय | सहभाग |
| --- | --- | --- | --- |
| ६ | २७ जुलै आणि २८ जुलै २०२० ॲ | महाराष्ट्रातील बाल संगोपन संस्थांमधील मुलांकरिता बाल न्याय कायदा, शिक्षण आणि आरोग्य या विषयावर प्रश्नोतर स्वरुपातील प्रश्नोतर स्वरूपाचे दोन दिवसांचे | माननीय मंत्री महोदय, महिला व बालविकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग. व इंटरनॅशनल जस्टीस मिशन या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने वेबिनार आयोजित करण्यात आले होते. सदर ऑनलाईन प्रशिक्षण कार्यशाळेस महिला व बालविकास विभागाचे प्रतिनिधी, आरोग्य विभागाचे प्रतिनिधी, शालेय शिक्षण विभागाचे प्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे सदस्य, सदस्य सचिव, अधिकारी कर्मचारी, धोरणकर्ते, 'इंटरनॅशनल जस्टीस मिशन संस्थेचे प्रतिनिधी, विषय तज्ञ, बाल कल्याण समिती चे अध्यक्ष / सदस्य, महाराष्ट्रातील बालगृहे / बाल निरीक्षण गृहांचे अधिक्षक असे जवळपास एकूण पाचशे पन्नासहून अधिक मान्यिर उपिस्थत होते. माननीय मंत्री महोदय. महिला व बालविकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग व इंटरनॅशनल जस्टीस मिशन या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने प्रश्नोत्तर स्वरूपाचे दोन दिवसांचे वेबिनार आयोजित करण्यात आले होते. महाराष्ट्रातील बालगृहांतील मुलांचे अनुषंगाने वेबिनार आयोजित केले होते. सदर वेबिनार मध्ये जे.जे. ॲक्ट, शिक्षण, आरोग्य या विषयाशी सबांधित प्रश्नांचा समावेश होता. वेबिनारच्या पहिल्या दिवशी दिनांक २७ जुलै २०२० रोजी महिला व बालविकास विभागातील, न्यायिक क्षेत्रातील तज्ज्ञ तसेच स्वयंसेवी संस्था, महिला व बालविकास विभाग अधिनस्त कार्यालय, सस्थांमधील ६०० पेक्षा जास्त व्यक्तींनी सहभाग घेतला. दिनांक २८ जुलै २०२० रोजी शिक्षण, आरोग्य या विषयावर सत्र संपन्न झाले. या मध्ये ६०० पेक्षा जास्त व्यक्तींनी सहभाग घेतला. वेबिनार मध्ये प्रश्नोतर स्वरूपातील संपूर्ण सत्रात महिला व बालविकास विभाग, न्यायिक क्षेत्र, शिक्षण, आरोग्य आणि स्वयंसेवी संस्थांतील तज्ज्ञ मंडळींनी मार्गदर्शन केले. |
| ७ | १२ सप्टेंबर २०२० | पॉक्सो ॲक्ट अंतर्गत २०१९ मधील दुरुस्ती आणि त्याची covid-१९ च्या कालावधीत प्रभावी अंमलबजावणी | महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग आणि इंटरनॅशनल जस्टीस मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने झूम द्वारे दिनांक १२ सप्टेंबर २०२० रोजी यशस्वी रित्या वेबिनार संपन्न झाला. सदर वेबिनारचे उद्‌घाटन मा. ॲड. यशोमती ठाकूर, मा. मंत्री, महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी केले. सदर वेबिनार करिता महिला व बाल विकास विभागाचे अधिकारी, पोलीस अधिकारी व न्यायालयीन अधिकारी उपस्थित होते. |

| अ. क्र. | दिनांक | वेबिनार विषय | सहभाग |
|---|---|---|---|
| ८ | २६ सप्टेंबर २०२० (आगामी) | दि. २६ सप्टेंबर रोजी झालेल्या वेबिनार च्या अनुषंगाने प्रश्नोतर स्वरूपाचा कार्यक्रम. | महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग आणि इंटरनॅशनल जस्टीस मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने झूम द्वारे दिनांक २६ सप्टेंबर २०२० रोजी यशस्वी रित्या वेबिनार संपन्न झाला. सदर वेबिनारचे उद्‌घाटन मा. ॲड. यशोमती ठाकूर, मा. मंत्री, महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी केले. सदर वेबिनार करिता महिला व बाल विकास विभागाचे अधिकारी, पोलीस अधिकारी व न्यायालयीन अधिकारी उपस्थित होते. या वेबिनार मध्ये ऑनलाइन प्रशिक्षणात विविध क्षेत्रातील सुमारे ५६० सहभागींची उपस्थिती होती. हा वेबिनार फेसबुकवरही लाइव्ह होता आणि २७०० लोकांनी पाहिला होता. |

**१. महाराष्ट्राच्या ३६ जिल्ह्यातील बालक कल्याण समित्या, महिला व बाल विकास विभागाची जिल्हा कार्यालये, जिल्हा बालक संरक्षण पथके व बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांच्या समवेत दिनांक २३ ते २५ एप्रिल २०२० रोजी झालेली दृकश्राव्य परिषद.**

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने महाराष्ट्राच्या ३६ जिल्ह्यातील बालक कल्याण समित्या, महिला व बाल विकास विभागाची जिल्हा कार्यालये, जिल्हा बालक संरक्षण पथके व बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांची दिनांक २३ ते २५ एप्रिल २०२० रोजी झालेली दृक्श्राव्य परिषद आयोजित केली होती. महिला व बाल कल्याण विभागाच्या अंतर्गत ३०० अधिकाऱ्यांसाठी आयोगाने विभागशः सहा सभा आयोजित केल्या. कोव्हीड १९ महासाथीच्या दरम्यान बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांमधील बालकांच्या हितासाठी राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग, माननीय सर्वोच्च न्यायालय व खुद्द आयोगाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांवर तातडीने चर्चा करण्याचे उद्दिष्ट होते. टाळेबंदीच्या कालावधीत राज्य यंत्रणेने केलेल्या उपाययोजना आणि आपल्या कर्तव्यांचे निर्वाहन करताना महिला व बालकल्याण विभागाला आलेल्या अडचणींवर संभाव्य उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात आली. सदर बैठकाना धोरणात्मक महत्व होते आणि राज्यातील बाल न्याय यंत्रणेतील संस्थांच्या कामावर देखरेख ठेवून आयोगाने दैनंदिन पाठपुरावा केला.

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सदर संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविले. यामध्ये भूतपूर्व अध्यक्ष श्री प्रवीण घुगे, सदस्य सचिव श्रीमती सीमा व्यास, श्री संतोष शिंदे व श्री विजय जाधव हे सभासद, विधी सल्लागार श्री प्रमोद बडगी, प्रशासकीय अधिकारी श्रीमती मंजुषा कुलकर्णी, महिला व बालकल्याण विभागाचे विभागीय उपायुक्त ( बालक संरक्षण ) श्री रवी पाटील आणि कोकण विभागाचे विभागीय आयुक्त श्री राहुल मोरे समाविष्ट होते. महाराष्ट्र राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यातील महिला व बाल कल्याण विभागाचे अधिकारी, जिल्हा बालक संरक्षण पथकांचे प्रतिनिधी व बाल कल्याण समित्यांचे अध्यक्ष / सदस्य हे प्रतिनिधी म्हणून सदर ऑनलाईन संमेलनास उपस्थित होते.

**उद्दिष्टे**

श्री संतोष शिंदे व डॉक्टर मंजुषा कुलकर्णी यांनी संचालित केलेल्या या बैठकांमध्ये त्यांचे महत्व व टाळेबंदीच्या दरम्यान बालकाची देखभाल करणाऱ्या संस्थांवर नियमित देखरेख ठेवण्याचे महत्व विशद केले. शासकीय अधिसूचनांच्या अंमलबजावणी सोबत हे देखील आवश्यक होते. प्रत्येक जिल्ह्याला खालील बाबींवर तपशीलवार अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले होते :

१. बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांची जिल्ह्यातील संख्या आणि त्यामध्ये दाखल बालकांची संख्या

२. टाळेबंदीच्या दरम्यान नवीन दाखल झालेल्या बालकांची संख्या

३. टाळेबंदीच्या दरम्यान मुक्त केलेल्या किंवा पालकांना सुट्टीसाठी सुपूर्द केलेल्या बालकांची संख्या

४. माननीय सर्वोच्च न्यायालय, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग व महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करताना प्रत्येक जिल्ह्यापुढे उभी राहिलेली आव्हाने.

सदर टाळेबंदीच्या कालावधीत बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांचे मूल्यमापन करणे आवश्यक असल्याचे श्री प्रवीण घुगे यांनी प्रतिपादन केले. तसेच बालकांची देखभाल करणाऱ्या राज्यातील संस्थांचे परिस्थितीजन्य विश्लेषण करण्याचे सदर बैठकांचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. टाळेबंदीच्या कालावधीत आपले कर्तव्य बजावताना अधिकाऱ्यांना आलेल्या समस्या स्पष्टपणे सांगितल्या आणि अधिक उत्तम व भक्कम समन्वय होण्यासाठी प्रत्येकाने आपण हाती घेतलेले उपक्रम व त्यामध्ये आलेल्या अडचणी या मंचावर कथन करण्याचे आवाहन केले.

तीन दिवस झालेल्या विभागवार बैठकींचे तपशील खालील तक्त्यात दर्शविले आहेत. खालील नमूद जिल्ह्यातील महिला व बाल विकास विभागाची कार्यालये व बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांना सदर बैठकांचे तपशील इ मेल व दृकश्राव्य माध्यमातून अग्रेषित करण्यात आले.

| दिनांक | विभाग | जिल्हे |
|---|---|---|
| २३ एप्रिल २०२० | कोकण | मुंबई शहर व मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, पालघर व सिंधुदुर्ग |
| २३ एप्रिल २०२० | पुणे | पुणे, सोलापूर, सातारा, सांगली व कोल्हापूर |
| २४ एप्रिल २०२० | नाशिक | नाशिक, जळगाव, अहमदनगर व नंदुरबार |
| २४ एप्रिल २०२० | नागपूर | नागपूर, चंद्रपूर, वर्धा, भंडारा, गडचिरोली व गोंदिया |
| २५ एप्रिल २०२० | औरंगाबाद | औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, लातूर, नांदेड, हिंगोली, परभणी व जालना |
| २५ एप्रिल २०२० | अमरावती | अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम व बुलढाणा |

**बैठकीतील क्षणचित्रे :**

सर्व जिल्ह्यांनी आपापल्या अधिकार क्षेत्रातील मुलांची देखभाल करणाऱ्या संस्थांची व त्यातील बालकांची संख्या सादर केली. सदर अहवालात खालील बाबी समाविष्ट होत्या :

जारी झालेल्या कोव्हीड १९ बाबतची माहिती आणि दिशानिर्देशांची केलेली अंमलबजावणी .

- सर्व जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांशी दृकश्राव्य बैठकांच्या माध्यमातून नियमित पाठपुरावा आणि परिस्थितीचे मूल्यमापन.
- बालकांची काळजी घेणाऱ्या बहुविध संस्थातील बालके व कर्मचाऱ्यांना स्वच्छकारी, मुखपट्ट्या व हात धुण्याच्या साबणासारख्या अत्यावश्यक वस्तूंचे वितरण. दोन ते सहा आठवडे पुरेल इतके हात धुण्याच्या साबण वड्या, मुखपट्ट्या व अन्नधन्य सदर निवाऱ्यामध्ये पुरविण्यात आले होते.
- बालकांची देखभाल करणाऱ्या काही संस्थांनी बालकांना घरी जाऊ दिले असले तरी सगळ्यांनाच तशी परवानगी मिळालेली नाही. रीतसर परवानगी घेऊन थोड्या बालकांना त्यांच्या पालकांकडे सुपूर्द करण्यात आले. चिंता आणि तणाव जाणवणाऱ्यासाठी समुपदेशन सेवांची व्यवस्था करण्यात आली होती. .
- निवारा गृहात नव्याने दाखल बालकांना विलगीकरण प्रभागात ठेवण्यात आले आहे. काही जिल्ह्यांमध्ये विलगीकरण केलेल्या बालकांसाठी वेगळी जागा निर्माण करण्यात आली असून त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आले आहे. अनेक निरीक्षणगृहांनी बालके आणि बलीकांसाठी वेगवेगळे विलगीकरण विभाग सुरु केले आहेत. विलगीत बालकांना टाळेबंदीनंतरच्या कालावधीत निरीक्षणगृहात दाखल करण्यात आल्याची खातरजमा यामुळे झाली. एचआयव्ही सकारात्मक ( विशेष गरजा असणाऱ्या ) बालकांची देखील सदर कालावधीत विशेष काळजी घेण्यात आली.
- टाळेबंदीच्या कालावधीत सर्व अत्यावश्यक गरजा पूर्ण होत असल्याची खातरजमा करण्यासाठी महिला व बालकल्याण विभाग व बाल कल्याण समित्यांनी बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांशी समन्वय ठेवला होता. तसेच बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांतील कर्मचारी व सुरक्षा कर्मचाऱ्यांना स्वच्छतेच्या उपाययोजनांच्या सोबतच अन्य संबंधित माहिती व कोव्हीड १९ विषयावरील

लघुचित्रपट देण्यात येत होते.

- अनेक जिल्ह्यांनी जागृती सत्रे यशस्वीपणे आयोजित केली, अत्यावश्यक वस्तूंचे संकलन करून ते बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांमधील बालके व त्यांची काळजी घेणाऱ्यांना वितरित केले. आरोग्यपूर्ण पद्धतीचे पालन करण्यासाठी प्रशिक्षणाचे आयोजन ही नित्याची बाब झाली आहे. दोन्ही विभागातील अनेक जिल्ह्यांनी शिध्याचा व अन्य अत्यावश्यक वस्तूंचा साठा नियमितपणे केला होता. महिला व बालकल्याण विभाग, बाल कल्याण समित्या, जिल्हा बालक संरक्षण पथके व बालकांची देखबहाल करणाऱ्या संस्था हे सगळेच टाळेबंदीच्या आधी व दरम्यान वस्तूंचा नियमित व पर्याप्त साठा तसेच स्वच्छतेच्या सवयींचे पालन होत असल्याची खातरजमा व पालकांना सुपूर्द केलेल्या बालकांकडे नियमित पाठपुरावा करीत होते.

- बाल कल्याण समित्यांनी आपापल्या चिंता सक्रियपणे आयोगाला कळविल्या होत्या. आगामी महासाथीशी मुकाबला करण्यासाठी काहींनी विशेष व्यवस्था केली होती. उदाहरणार्थ सांगली बाल कल्याण समितीने त्यांच्या समक्ष असलेल्या आव्हानांची चर्चा करण्यासाठी बाल न्याय मंडळाशी झूम बैठकीचे आयोजन केले. दुसऱ्या एका जिल्ह्याने अन्नधान्य कमी किमतीला खरेदी करण्यासाठी परवानगी देण्याची विनंती केली. आणखी एकाने तर टाळेबंदीच्या कालावधीत बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी ५ सदस्यांच्या समितीची स्थापना केली.

➢ **विभागांनी नोंद घेतलेल्या कार्यवाहीचे मुद्दे :-**

- टाळेबंदीच्या दरम्यान मुक्त केलेल्या त्यांच्या देखरेखी खालील बालकांचा मागोवा बाल कल्याण समिती ठेवत असली तरीही महिला व बाल कल्याण विभाग पुणे यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये काही गोंधळ झाला आहे. टाळेबंदीच्या दरम्यान कुटुंबाकडे सुपूर्द केलेल्या बालकांची संख्या शोधण्यासाठी आणि त्याची चौकशी करण्यासाठी आयुक्तालयाने जिल्हा अधिकाऱ्यांना नियुक्त केले आहे. काही बाबतीत बालकांना त्यांच्या पालकांकडे सुपूर्द करण्यापूर्वी कोणत्याही प्रकारचा सामाजिक तपास अहवाल सादर न केल्यामुळे महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने ते करून आयोगाला अहवाल सादर कण्याचे आणि त्यामध्ये टाळेबंदी पूर्वी सदर सुपूर्दगीची कारणे नमूद निर्देश बाल कल्याण समितीला दिले

- चाईल्ड लाईनशी जिल्हावार संपर्क साधून नवीन प्रकरणांच्या नोंदी शोधण्याचे निर्देश आयोगाने विभागीय कार्यालयांना दिले. बाल कल्याण समिती आणि बालकांची देखभाल करणाऱ्या समित्यांकडे सुपूर्द केलेल्या बालकांचे हितसंबंध जोपासण्यासाठी त्यांचा जिल्हा कार्यालयांशी योग्य व स्पष्ट समन्वय असणे आवश्यक असल्याची शिफारस आयोगाने केली आहे.

- प्रत्येक जिल्ह्यातील निवारा गृहाची क्षमता आणि त्यातील घरी पाठवलेल्या बालकांची संख्या आणि गरज असल्यास बाल कल्याण समितीला आवश्यक ती परवानगी प्राप्त झाली होती (जेणे करून आवश्यक असल्याशिवाय बालकांना मुक्त केले जाऊ नये) किंवा कसे याबाबत मागोवा घेऊन महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाला अहवाल देण्याचे निर्देश प्रत्येक जिल्ह्याला देण्यात आला होता. सद्य कोव्हीड महासाथीमुळे पालकांनी बालकांचा ताबा घेण्याची देखील काही प्रकरणे आहेत. आणि काही परिस्थितीत सामाजिक तपास अहवाल तयार न करताच बालकांना मुक्त करण्यात आल्यामुळे त्याचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

- महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सहकार्याने बाल कल्याण समित्यांची बाल न्याय अधिनियम आणि नियम या विषयावर अभिमुखन कार्यशाळा घेण्याची शिफारस महिला व बाल कल्याण आयुक्तालयाने केली आहे. त्यांनी सर्व जिल्ह्यांना खालील प्रमाणे निर्देश दिले आहेत.

- करोना महासाथीच्या कालावधीत आयुक्तालयाने बाल न्याय अधिनियमाच्या अंतर्गत बालकांची देखभाल करण्यासाठी विमोचीत केलेल्या निधीचा उपयोग बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांनी अन्य कोणत्याही प्रयोजनार्थ न करता फक्त बालकांची देखभाल करण्याच्या प्रयोजनार्थ उपयोग करणे अनिवार्य आहे.

- बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांनी संस्थेत दाखल झालेल्या किंवा मुक्त केलेल्या बालकांच्या नोंदी योग्य प्रकारे ठेऊन त्याचे नियमित अहवाल सादर केले पाहिजेत.

- मुक्त केलेल्या किंवा रजेवर असलेल्या बालकांचा देखभाल करणाऱ्या संस्थांनी नियमित पाठपुरावा करणे आवश्यक आहे. शक्य असल्यास बालकांना त्यांच्या कुटुंबासोबत राहण्याची परवानगी देणे महत्वाचे आहे. बालकांसाठी सुरक्षित असेल त्याच प्रकरणी बालकांना मुक्त करण्यात यावे, एवढीच खातरजमा महाराष्ट्र राज्य बाल हक्क आयोगाला करावयाची आहे.

**२) दि. ३ मे २०२० – बालकांचे ऑनलाईन अत्याचारापासून संरक्षण करण्यासाठी रणनीतीची धोरणात्मक अंमलबजावणी करण्याबाबत राष्ट्रीय परिसंवाद**

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग व आंतरराष्ट्रीय न्याय अभियान (International Justice Mission (IJM) यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १३ मे २०२० रोजी बालकांचे ऑनलाईन अत्याचारापासून संरक्षण करण्यासाठी रणनीतीची धोरणात्मक अंमलबजावणी करण्याबाबत राष्ट्रीय परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्र शासनाचे महिला व बाल कल्याण मंत्रालय, राज्य स्तरावरील बाल हक्क संरक्षण आयोग, महिला आयोग व मानवाधिकार आयोगाचे सदस्य, कायद्यांची अंमलबजावणी करणाऱ्या अभिकरणातील प्रतिनिधी, धोरणकर्ते, न्यायपालिकेत कार्यरत व्यक्ती, शिक्षणतज्ञ, आणि नागरी समाज संघटनांचे प्रतिनिधी असे सर्व मिळून सुमारे ३०० जण सहभागी झाले होते. इतक्या विविध क्षेत्रातील व्यक्तींच्या सहभागामुळे बालकांच्या ऑनलाईन होणाऱ्या लैंगिक शोषणासारख्या घृणास्पद गुन्ह्यांशी संबंधित सर्व विषयांच्या बाबत व्यापक स्तरावर चर्चा झाल्याची खातरजमा झाली.

**उद्दिष्टे**

सर्व हितसंबंधीयांना एकाच मंचावर पाचारण करून सदर विषयावर सर्वांगीण चर्चा करणे व बालकांवर होणाऱ्या ऑनलाईन लैंगिक अत्याचाराबाबत सामाईक उपाययोजनेचा विचार करणे, हे सदर वेबीनारचे उद्दिष्ट होते. टाळेबंदीच्या कालावधीनंतर सदर गुन्ह्यांवर नियंत्रण आणण्याच्या शासनाच्या प्रयत्नांना पाठबळ मिळण्यासाठी समन्वित व एकसंध वैधानिक कार्यवाहीच्या माध्यमातून धोरणे व रणनीती निर्धारित करणे महत्वाचे आहे. सदर अंतिम उद्दिष्टांच्या अनुषंगाने वेबीनार मध्ये खालील बाबींवर चर्चा व विचारविनिमय करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले होते.

- मुलांचे ऑनलाईन लैंगिक शोषण करण्यासाठी अत्याचारी आणि विक्रुत व्यक्तींमधील पुढे येणारे नवीन नवीन कल आणि ते वापरत असलेली विविध तंत्रज्ञाने
- ऑनलाईन लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी समाज माध्यामासारख्या मध्यस्थांची भूमिका
- सायबर सुरक्षिततेबाबत प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय स्तरावरील सद्य सर्वोत्तम पद्धती
- ऑनलाईन लैंगिक अत्याचारांविरोधात लढा देण्यासाठी कायदेशीर चौकट
- राज्य स्तरावर एक मजबूत निवारण यंत्रणा असण्यासाठी पुढाकार
- आंतरनिरसन आणि प्रतिबंधात्मक धोरणांच्या सद्य प्ररुपांचे प्रमाणीकरण
- ऑनलाईन लैंगिक शोषणाचा बालकाच्या मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम

**वेबीनार मधील क्षणचित्रे**

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालकल्याण विभागाच्या मंत्री माननीय श्रीमती यशोमती ठाकूर या मुख्य वक्त्या होत्या. " ऑनलाईन लैंगिक शोषण हा एक घन विषय असून बालकांसाठी सुरक्षित अवकाश निर्माण करण्यासाठी आपण सगळ्यांनी मिळून काम करणे आवश्यक आहे. आभासी जगात घडणाऱ्या गुन्ह्यांकडे सहसा कोणाचेच लक्ष जात नाही आणि गुन्हेगार उजळ माथ्याने समाजात वावरतात – ऑनलाईन आभासी जगात देखील कायद्याची कसोशीने अंमलबजावणी होईल याची आपण खातरजमा केली पाहिजे. त्यामुळेच अशा गुन्ह्यांशी लढा देण्यासाठी सर्व हितसंबंधी यंत्रणा व व्यक्तींनी एकमेकांशी सहकार्य केले पाहिजे".

आंतरराष्ट्रीय न्याय अभियानाच्या (International Justice Mission (IJM) परिचालन संचालिका श्रीमती मेलीस्सा वालावलकर यांनी आपल्या उद्‌घाटनपर भाषणात टाळेबंदी नंतरच्या कालावधीत आभासी जगामध्ये मुलांसाठी सुरक्षित अवकाश निर्माण करण्यासाठी सुस्पष्ट योजनेची रूपरेषा आखणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. " सर्वात भेद्य व्यक्तींना न्याय मिळण्यासाठी आमची संस्था नेहमीच आघाडीवर लढा देईल आणि एक सामुहिक बदल घडविण्यात शासनाला पाठबळ देण्यासाठी आमच्या क्षमतेनुसार शक्य आहे ते सर्व करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत " असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्य सचिव व भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी श्रीमती सीमा व्यास यांनी संबोधित करताना " अशा गर्हणीय अपराधांच्या विरुद्ध सामुहिक कृती करण्यासाठी आणि जागरूकता निर्माण करण्यासाठी असे वेबीनार हे सर्वोत्तम व्यासपीठ असते " असे प्रतिपादन केले. सदर वेबीनार मध्ये विविध पार्श्वभूमी असलेले महनीय वक्ते सहभागी झाल्यामुळे त्यांनी प्रतिपादन केलेल्या विविध उपयुक्त मुद्द्यातून एक दृष्टीकोन पुढे येण्यास मदत झाली. या विशिष्ट प्रकारचे गुन्हे हाताळताना त्यांना आलेले अनुभव त्यांनी कथन केले.

बेपत्ता आणि शोषित बालकांसाठी आंतरराष्ट्रीय केंद्राचे ( International Centre for Missing and Exploited Children ) कायदा अंमलबजावणी प्रशिक्षण व तंत्रज्ञान विषयक संचालक श्री गुईलेरमो गलारझा यांनी सर्व सहभागी व्यक्तींना अशा गुन्ह्यांचे गांभीर्य आणि तीव्रता समजली असल्याची खातरजमा केली. भारताचे राष्ट्रीय गुन्हे अभिलेख कार्यालय व बेपत्ता आणि शोषित बालकांसाठी राष्ट्रीय केंद्राचे दरम्यान स्वाक्षरीत झालेल्या सामंजस्य कराराचे उदाहरण उधृत करत विविध विभाग व देशांमध्ये समन्वय असण्याच्या महात्वाकडे त्यांनी सर्वांचे लक्ष केंद्रित केले.

केरळ पोलिसांच्या सायबरडोमचे शीर्षस्थ अधिकारी व अतिरिक्त पोलीस महासंचालक (मुख्यालय) तसेच भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी श्री मनोज अब्राहम यांनी केरळ राज्यात अवलंबलेल्या सर्वोत्तम पद्धतीतून इतर राज्याना देखील अशीच कार्यवाही करण्यासाठी कशी प्रेरणा मिळाली हे कथन केले. सार्वजनिक व खासगी क्षेत्रातील सहयोगामुळे केरळ मध्ये अशा गुन्ह्यांबाबत जागरूकता निर्माण करण्यासोबतच त्यांना बऱ्याच अंशी पायबंद देखील घातला असे आग्रही प्रतिपादन केले.

फेसबुक इंडियाचे विश्वास व सुरक्षितता विषयक प्रमुख श्री सत्य यादव यांनी असे घृणास्पद गुन्हे घडूच नयेत यासाठी फेसबुकने योजलेल्या विविध उपाययोजनांची माहिती दिली.बालकांच्या ऑनलाईन लैंगिक शोषणाचा सामना करण्यासाठी त्यांनी कृत्रिम प्रज्ञा व अध्ययनाचा अधिकाधिक वापर करण्याचे महत्व विशद केले.

मुंबई मधील मानसतज्ञ डॉक्टर हरीश शेट्टी यांनी पिडीत बालकांवर लक्ष केंद्रित करत एक नवा दृष्टीकोन मांडला. पिडीत व्यक्तीचे मानसिक स्वास्थ्य सुधारण्यासाठी प्रयत्न होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

प्राईसवाटर कुपरहाउस इंडियाचे कार्यकारी संचालक श्री कृष्णा शास्त्री पेंड्याला यांनी या विषयावर सार्वजनिक जागरुकता वाढविण्याचे महत्व प्रतिपादन केले आणि प्रत्येक शाळेने सायबर नैतिकता या विषयाचा आपल्या अभ्यासक्रमात समावेश करावा अशी सूचना केली. प्रतिक्रियात्मक दृष्टीकोणाच्या ऐवजी कडून सक्रीय व भविष्यसूचक दृष्टीकोन अवलंबण्याचा त्यांनी पुरस्कार केला. माहिती लपवून ठेवण्यासाठी गुन्हेगार कोणकोणत्या पद्धतीचा अवलंब करतात यावरही त्यांनी प्रकाश टाकला.

**आयोग मार्फत करण्यात आलेल्या शिफारशी**

माननीय मंत्री श्रीमती यशोमती ठाकूर यांनी सायबर गुन्हे हाताळण्याच्या केरळ राज्यातील पद्धतीबाबत समजून घेण्यासाठी केरळ पोलीस सायबरडोमचे प्रमुख व भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी श्री मनोज अब्राहम यांनी मार्गदर्शन करण्याचा आग्रह धरला. महाराष्ट्र राज्यात केरळ सायबरडोम प्रारूपाची अंमलबजावणी करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

बेपत्ता आणि शोषित बालकांसाठी आंतरराष्ट्रीय केंद्राने बाल अश्लीलते बाबत तयार केलेल्या आदर्श कायद्याच्या मसुद्या आधारित लैंगिक शोषणाला प्रतिबंध करणारा राष्ट्रीय कायदा पारित करण्यात यावा अशी श्री गुईलेरमो गालारझा यांनी शिफारस केली.

सायबर गुन्हे हाताळण्यासाठी भारतातील प्रत्येक राज्याने सार्वजनिक खासगी सहयोगाच्या प्रारुपाची अंमलबजावणी करावी अशी सूचना श्री मनोज अब्राहम यांनी केली. बालकांचे ऑनलाईन लैंगिक शोषण थांबविण्यासाठी माहितीची देवाणघेवाण हाच प्रभावी उपाय असल्यामुळे राज्य शासनाने विविध आंतरराष्ट्रीय संस्था व संघटनांशी संपर्क साधावा असा आग्रह धरला.

बालकांमध्ये अश्लील साहित्याच्या प्रसारास प्रतिबंध करण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांनी कृत्रिम प्रज्ञा व यांत्रिक अध्ययन तंत्रांचा वापर करावा असा श्री सत्य यादव यांनी आग्रह धरला.

पालक, शिक्षक व बालकांमध्ये सायबर गुन्ह्यांबाबत जागरूकता निर्माण होण्यासाठी शाळांनी विस्तृत स्वरुपात काम करण्याची गरज असल्याची सूचना डॉक्टर हरीश शेट्टी यांनी केली. बाहेर वाच्यता न झालेल्या बऱ्याच गुन्ह्यांमध्ये गुन्हेगार हे तरुण सज्ञान मुले किंवा शिक्षकच असल्यामुळे आणि सध्याची प्रणाली बालकांचे लैंगिक आकर्षण असणाऱ्यावरच लक्ष केंद्रित करीत असल्यामुळे हे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. ऑनलाईन लैंगिक अत्याचारांचे पिडीत असलेल्या बालकांसाठी मानसिक स्वास्थ्य विषयक उपाययोजना त्यांच्या पुनार्वासानाला पोषक असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

सायबर गुन्हे विषयक आंतरराष्ट्रीय करारावर भारताने स्वाक्षऱ्या करण्याची शिफारस श्री कृष्ण शास्त्री पेंड्याला यांनी केली. सदर करारावर भारताने अद्याप स्वाक्षरी न केल्यामुळे वैश्विक स्तरावरील माहितीची देवाणघेवाण करता येत नाही आणि त्यामुळे कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा गुन्हेगारांच्या माहिती असलेल्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील माहितीपासून वंचित राहतात.

सायबर गुन्हे हाताळण्यासाठी एक केंद्रीकृत कायदे अंमलबजावणी करणारी यंत्रणा निर्माण करण्याची त्यांनी सूचना केली. अशा प्रकारच्या गुन्ह्यांना कोणत्याही सीमा नसल्यामुळे कायदे अंमलबजावणी करणारी केंद्रीकृत यंत्रणा गरजेची असल्याचे त्यांनी सांगितले. सायबर नितीमत्ता हा विषय शाळेतील अभ्यासक्रमांत समाविष्ट करणे आवश्यक आहे.

**३. दि.२९ मे, २०२० :- कोरोना विषाणू संसर्गामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागाशी संबंधित विषयाबाबत चर्चा करण्यासाठी सदर ऑनलाईन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.**

मा. सचिव महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग मुंबई यांच्या सूचनेनुसार दि. २९-५-२०२० रोजी दृकश्राव्य माध्यमाद्वारे शालेय शिक्षण विभागा सोबत एकत्रित बैठक आयोजित करण्यात आली.

कोरोना विषाणू संसर्गजन्य परिस्थितीमुळे पालक विद्यार्थी या सर्वांच्या मनात अनेक प्रश्न आहेत. त्याबाबत आयोगास संपर्क करतात प्रामुख्याने इयत्ता १० व इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांचे झालेल्या परीक्षेचे पेपर तपासणे निकाल जाहीर करणे शाळा कधी सुरू होणार आहेत. काही देशांमध्ये प्राथमिक शाळा अगोदर सुरू होणार आहेत व माध्यमिक नंतर तर काही देशात माध्यमिक शाळा अगोदर व प्राथमिक शाळा नंतर सुरू होणार आहेत शाळा ऑनलाईन सुरू होणार व प्रचलित पद्धतीने सुरू होणार तसेच शाळा सुरू झाल्यानंतर midday meal चे आयोजन कसे होणार आरटीई (RTE) प्रवेश प्रक्रियेची यावर्षीची सद्यस्थिती याबाबत विभागाचे नियोजन पूर्वतयारी या बाबत चर्चा करण्यात आली

**४. दि. १० जून, २०२० : महाराष्ट्रातील बालकांच्या विरुद्ध होणारे गर्हणीय गुन्हे हाताळण्यासाठी केरळ सायबर डोम पोलिसांशी बैठक**

राष्ट्रीय वेबीनार मधील विचारविनिमय झालेल्या उपक्रमानुसार बालकांच्या विरुद्ध होणाऱ्या गर्हणीय अपराधांना प्रतिबंधित करण्यासाठी भारतातील विविध राज्यांनी केलेल्या विविध उपाययोजनांच्या माहितीची देवाण घेवाण करण्यासाठी आयोगाने पुढाकार घेतला. त्या अनुषंगाने आयोगाने केरळ सायबर डोम पोलिसांसोबत सायबर सुरक्षिततेबाबत फलदायी, विधायक आणि खुली देवाण घेवाण केली आणि यापुढे देखील अन्य राज्यांच्या अंतरनिरासनाच्या प्रारूपांचा अभ्यास करता येईल.

सदर प्रयत्नांच्या अनुषंगाने आयोगाने सायबर गुन्ह्यांचा प्रभाव आणि त्यातील आव्हाने तसेच बालकांच्या ऑनलाईन शोषणाबाबत राज्याच्या येऊ घातलेल्या प्रतिसादा बाबत धोरणात्मक स्तरावर संवाद साधला.

केरळ पोलीस सायबर डोमचे अतिरिक्त पोलीस महासंचालक श्री मनोज अब्राहम हे एक सार्वजनिक खासगी सहयोगाचे उदाहरण असलेल्या सायबर डोम बाबत बोलले. प्रत्येक पक्षकाराची भूमिका व जबाबदारी निश्चित करणारे औपचारिक सामंजस्य करार स्वाक्षरीत करण्यात आले आहेत. केरळ राज्यात सदर प्रकल्प स्थापित करण्यासाठी दोन वर्षे लागली आणि आसाम व राजस्थानात प्रतीकृत करण्यात येत आहे. माहिती तंत्रज्ञान, बिगर शासकीय संघटना व ( नैतिक विदाहरकांच्या) आंतरराष्ट्रीय संस्था, फेसबुक, गुगल आणि बँकांमधील सुमारे ५००० प्रतिनिधी सायबर डोमशी संलग्न झाले आहेत. (तांत्रिक कौशल्यांच्या आधारे निवड केलेले केरळ पोलीस दलातील २२ अधिकारी सायबर डोम मध्ये कार्यरत आहेत. कठोर तपासणी करून निवड केलेले स्वयंसेवक विना मोबदला काम करतात आणि त्यांना उपसमादेशक / समादेशक म्हणून ओळखपत्रे जारी करण्यात आली आहेत आणि त्यांना या बाबीचा अभिमान वाटतो. आज्ञावली मोफत असल्यामुळे आणि तज्ञ कुठलेही शुल्क आकारत नसल्यामुळे केरळ राज्य शासनाने दिलेले २ करोड रुपयांची रक्कम पर्याप्त आहे. सगळ्यांना नियमित प्रशिक्षण देण्यात येते. सदर पथक स्वतंत्रपणे कार्यरत असून थेट पोलीस महासंचालकांना उत्तरदायी आहे.

गुन्हे घडू नयेत म्हणून एक प्रतिबंधक उपाययोजना म्हणून सायबर डोम कसे कार्य करते हे केरळ पोलीस दलातील सायबर गुन्हे हाताळणारे पोलीस महानिरीक्षक श्री एस श्रीजीत यांनी विशद केले. अश्लील मजकूर व साहित्य डाउनलोड करणाऱ्या व्यक्तींची माहिती आज्ञावलीमुळे निर्धारीत करणे पोलिसांना शक्य होत असल्यामुळे अशा व्यक्तींना तत्काळ अटक करणे शक्य झाले आहे. फक्त तांत्रिक पाठबळ देण्यात येते. बँकांशी संबंधित सायबर गुन्ह्यांची संख्या सुमारे २०० असून आणि अश्लील साहित्य डाउनलोड करण्याशी संबंधित गुन्ह्यांची संख्या ५० ते ६० आहे. राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यातील एक पोलीस ठाणे बालकस्नेही असून त्या पोलीस ठाण्यांची रचना उद्यानासारखी केल्यामुळे बालकांना तिथे आरामदायक वाटते. विविध तज्ञांना अशा बालकस्नेही पोलीस ठाण्यांशी जोडण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्याच्या सायबर कक्षाचे अधीक्षक श्री सचिन पांडकर यांनी महाराष्ट्र राज्यात १२५९ पोलीस ठाणी व प्रत्येक जिल्ह्यात ४८ सायबर कक्ष असल्याचे सांगितले. सदर कक्ष व पथके हे ऑनलाईन तक्रारी स्वतंत्रपणे हाताळतात व महिला व बालकांच्या तक्रारी स्वीकारण्यासाठी विशेष संकेतस्थळ विकसित करण्यात आले आहे. प्राप्त झालेली माहिती हरवलेल्या व पिडीत बालकांच्या राष्ट्रीय केंद्राकडे

सुपूर्द करून संबंधित पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात येते. आतापर्यंत प्राप्त १४६ तक्रारींच्या आधारे ५० व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. केरळ सायबर डोममधील कामाची पद्धत समजून घेण्यासाठी महाराष्ट्र सायबर कक्षातील अधिकाऱ्यांनी जानेवारीच्या सुरवातीला केरळ राज्याला भेट दिली होती. सदर प्रारूप राज्यात प्रतीकृत करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून तो आयोगाला देखील सादर करण्यात येईल.

टाळेबंदी उठल्यानंतर केरळ सायबर डोमला भेट द्यायला आणि तेथील विशेष तज्ज्ञांशी त्यांच्या कामाबाबत चर्चा महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाला नक्कीच आवडेल असे आयोगाच्या सचिव श्रीमती सीमा व्यास यांनी सांगितले. महाराष्ट्र राज्यात सायबर डोमची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी आयोग पूर्ण सहकार्य करेल अशी ग्वाही त्यांनी दिली.

ऑनलाईन शोषणापासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी दोन्ही राज्यातील पोलीस सातत्याने घेत असलेल्या परिश्रमांची आंतरराष्ट्रीय न्याय अभियानाच्या परिचालन विषयक संचालिका श्रीमती मेलिसा वालावलकर यांनी प्रशंसा केली. राज्यातील बालकांसाठी सुरक्षित अवकाश करण्यासाठी महाराष्ट्र सायबर पोलीस आणि आयोगाला पूर्ण पाठबळ देण्याची त्यांनी ग्वाही दिली.

**५. दिनांक १६ जून २०२० कोव्हीड १९ च्या पश्चात मार्गदर्शक तत्वे व दिशानिर्देशांबाबत बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम**

**५.१ –** कोव्हीड १९ च्या पश्चात मार्गदर्शक तत्वे व दिशानिर्देशांबाबत महराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांसाठी दिनांक १६ जून २०२० रोज प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. महाराष्ट्र राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण मंत्री माननीय ॲडव्होकेट श्रीमती यशोमती ठाकूर, महराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्य व भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी श्रीमती सीमा व्यास, महिला व बाल कल्याण विभागाचे आयुक्त व भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी डॉक्टर ऋषिकेश यशोद व आंतरराष्ट्रीय न्याय अभियानाच्या परिचालन संचालिका श्री.मेलीस्सा वालावलकर तसेच महिला व बालकल्याण विभाग, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, महराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगातील अधिकारी धोरणकर्ते, विषयतज्ञ, आंतरराष्ट्रीय न्याय अभियानाचे अधिकारी, महाराष्ट्र राज्यातील बाल कल्याण समित्यांचे व बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांचे अधिकारी व बिगर शासकीय संस्थांचे प्रतिनिधी सदर प्रशिक्षणाला उपस्थित होते. ऑनलाईन झालेल्या सदर प्रशिक्षणात विविध क्षेत्रातील ५५० प्रतिनिधी सहभागी उपस्थित होते.

**५.२ उद्दिष्टे :–** बालकांची देखभाल करणाऱ्या विविध संस्थांमध्ये ठेवलेल्या बालकांमध्ये कोव्हीड १९ विषाणूचा प्रसार न होण्यासाठी प्रतिसादात्मक कार्ययोजना तयार करण्यासाठी आणि महिला व बालविकास विभागाच्या आघाडीवरील कार्यकर्त्यांना तयार करण्यासाठी सदर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. बालन्याय अधिनियमातील तरतुदीनुसार जारी टाळेबंदी नंतरच्या मार्गदर्शक सूचनानुसार निवारागृहातील बालकांशी प्रत्यक्ष संबंधित कार्यकर्त्यांसाठी अभिमुखन व प्रशिक्षण कार्यक्रम तातडीने आयोजित करण्याची गरज एप्रिल महिन्यात झालेल्या बालकल्याण समिती, जिल्हा अधिकारी व बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांच्या दृक्श्राव्य परिषदेत आयोगाने व्यक्त केली होती. टाळेबंदी नंतरच्या कालावधीत आरोग्य विषयक दिशानिर्देश, प्रभावी द्वारपालन, ऑनलाईन शैक्षणिक संसाधने, अभ्यागत नियमावली, बालकल्याण समित्यांचे आदेश व प्रारूपे याबाबत आयोगाने मार्गदर्शन केले. बालकल्याण समित्यांच्या कामकाजावर आयोगाने बारीक नजर ठेवली असून तेथील परिस्थितीचा सातत्याने आढावा घेण्यात येत आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रमांच्या माध्यमातून बालकांच्या सुरक्षितता व संरक्षणाची काळजी घेण्यात येईल.

**५.३ प्रशिक्षण कार्यक्रमाची क्षणचित्रे**

**माननीय मंत्री ॲडव्होकेट श्रीमती यशोमती ठाकूर** यांनी खालील बाबी नमूद केल्या :-

- निवारागृहातील समुपदेशन सुविधांच्या माध्यमातून ताणतणावात असणाऱ्या बालकांना भावनिक व मानसिक आधार देण्यासाठी व त्यात सुधारणा करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांची गरज.
- कोव्हीड १९ टाळेबंदीच्या पश्चात जारी नियमावली, प्रतिबंधात्मक कार्यवाही व शिफारस केलेल्या नवीन कार्यपद्धतीची पूर्तता करण्याबाबत व ती अनुसरण्याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी सदर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.
- संस्थांच्या शैक्षणिक व तांत्रिक गरजांमध्ये वाढ करण्यासाठी आणि आंतरनिरासानाची गुणवत्ता सुधारण्यासाठी दैनंदिन कामात डिजिटल पद्धतीचा स्वीकार करण्याची गरज.

**श्रीमती मेलिस्सा वालावलकर यांनी खालील बाबींकडे लक्ष वेधले :**

विधी संघर्षित बालकांच्या देखभाल व सुरक्षिततेची काळजी घेण्यासाठी सर्जनशील व सहयोगाने काम करणे. त्यासाठी दिशानिर्देश व मार्गदर्शक तत्वांची अमलबजावणी करण्याच्या प्रक्रियेसाठी सर्वोत्तम पद्धतींची शिफारस करणाऱ्या दस्तऐवज आणि आदेशांचे एकत्रीकरण.

- राज्यातील बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांमधील रिकाम्या पदांचे मूल्यमापन करणे व त्यांना मिळणाऱ्या बिगर शासकीय संघटनांच्या पाठबळ सुव्यवस्थित करण्याची गरज .
- बालकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पाठबळ द्यावयाचे असेल तर राज्यातील बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांमधील रिकाम्या पदांचे मूल्यमापन करून परिविक्षाधीन अधिकारी, अधीक्षक व समुपदेशक यांची आवश्यक तिथे नियुक्ती करणे.

**डॉक्टर हृषीकेश यशोद यांनी खालील बाबी नमूद केल्या :-**

- बालकांच्या सर्वसामान्य आहार व आरोग्यावर लक्ष केंद्रित करताना बहुमुखी दृष्टीकोण. कोव्हीड १९ महासाथीच्या दरम्यान बालकांना पर्याप्त संसाधनांच्या वाटपाच्या सोबतच प्रक्रिया ऑनलाईन व डिजिटल करणे समाविष्ट आहे.
- बालकांना दत्तक संगोपना मध्ये सुपूर्द करण्यासारख्या पर्यायांना प्राधान्य देणे आणि संस्थांच्या ताब्यात सुपूर्द करण्याचा पर्याय हा अखेरचा उपाय असावा.
- ऑनलाईन पद्धतीने लाभांच्या थेट बँक खात्यात अंतरणाचा पर्याय वापरला पाहिजे. १८ वर्षांचे झाल्यावर निवारागृहातून मुक्त केलेल्या बालकांना त्यानंतर ३ वर्षे पर्यंत लाभांच्या थेट बँक खात्यात अंतरणाचा फायदा घेता आला पाहिजे. मंत्र्यांच्या नेतृत्वाखाली बालकांच्या देखभालीला पाठबळ देण्याची रक्कम रु ४५० वरून रु १००० इतकी वाढविण्यात आली आहे.
- कोव्हीड १९ पश्चात वित्त व्यवस्थेसाठी बाल न्याय निधी विमोचीत करणे ( टाळेबंदीच्या कालावधीत शिल्लक निधीचा उचित पद्धतीने वापर झाला होता ).
- निवारागृहातील बालकांना नियमित व वेळेवारी समुपदेशन सेवा उपलब्ध असणे. राज्याने नेमणूक केलेल्या समुपदेशकांना वेतन देण्यासाठी पर्याप्त निधी पुरविण्याची खबरदारी राज्याने घेणे आवश्यक आहे. बालकांना प्रभावी रीतीने मदत करण्यासाठी समुपदेशकांना वेळेवर वेतन देणे अतिशय महत्वाचे आहे .
- राज्य शासन, शिक्षण विभाग व बिगर शासकीय संस्थांच्या सहाय्याने डिजिटल अध्ययनाच्या माध्यमातून व्यावसायिक प्रशिक्षण व शिक्षण सुरु राहणे आवश्यक आहे.
- संतुलित व पोषक आहाराच्या सोबतचा नियमित व्यायाम व स्वच्छता ठेवल्यास बालकांच्या प्रतिकारशक्तीत वाढ होईल व ते सुरक्षित राहण्यास मदत होईल.

**महाराष्ट्र राज्याच्या आरोग्य विभागाच्या संचालक डॉक्टर श्रीमती अर्चना पाटील यांनी खालील बाबींवर भर दिला**

- बालकल्याण समित्यांच्या अखत्यारीतील निवारागृहात कोव्हीड १९ चा प्रसार रोखण्यासाठी योग्य त्या निर्जंतुकीकरण प्रक्रिया, श्वासानात्मक शिष्टाचारांचे प्रशिक्षण, सामाजिक अंतर ठेवणे, संनियंत्रण यासह अन्य सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना .
- कर्मचारी व बालकांची आजारासाठी चाचणी, मुखपट्ट्यांचा वापर व अभ्यागाताच्या बालकांशी संवादावर मर्यादा.
- संस्थांच्या आवारात सार्वजनिक जागी थुंकणे पूर्णपणे टाळणे.
- निवाऱ्यातील बालकांच्या व भेट देणाऱ्या अभ्यागतांच्या तापमान तपासणीसाठी अवरक्त तापमापकाचा वापर.

**महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण विभागाचे आयुक्त व भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी श्री विशाल सोलंकी यांनी सांगितले**

- विद्यार्थ्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य, तंत्रज्ञानात्मक व आर्थिक मर्यादा यांचा विचार करून पण पटावरील सर्व बालकांना शिक्षण या बाबीशी तडजोड न करता सर्व वर्ग ऑनलाईन घेण्याबाबत सर्व पैलूंचा विचार करून मार्गदर्शक सूचना जारी करणे. शिक्षणतज्ञ, शिक्षण विभाग व मंडळे, पालक व खुद्द विद्यार्थ्यांशी विचारविनिमय करून त्यांचा मसुदा तयार करण्यात यावा
- ग्रामीण भागातील बालकांना आकाशवाणी द्वारे शिक्षण देण्यासाठी संयुक्त राष्ट्र आंतरराष्ट्रीय बालक निधी, प्रहम व खान अकादमी यासारख्या संस्थांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्रात टाळेबंदीच्या कालावधीत ५० % वापर होत असल्याचे केंद्र शासनाच्या दिशा उपयोजनाने दाखवून दिल्याचे त्यांनी सांगितले.

- विशेष गरजा असलेल्या बालकांसाठी पुणे येथील राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेने विशेष पुस्तके, अभ्यासक्रम व सानुकुलीत साहित्य संरचित केले आहे. तांत्रिक ज्ञान शिकण्यासाठी व प्राप्त करण्यासाठी स्वावलंबी व विधायक पद्धती वापरण्यास बालकांना टाळेबंदीमध्ये शिकविले गेले पाहिजे.
- दूरदर्शन, आंतरजाल, आकाशवाणी इत्यादी सारख्या डिजिटल मंचाद्वारे बालकांना शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण घेण्यासाठी सर्जनशील दृष्टीकोन आवश्यक आहे. नाविन्यपूर्ण पद्धतीद्वारे भेद्य बालकांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी आंतर विभागीय समन्वय साधून विश्वासार्ह व ठोस कार्य योजना तयार करण्याचे त्यांनी आवाहन केले.

**प्रेरणाच्या सहसंस्थापक व संचालक श्रीमती प्रीती पाटकर यांनी खालील बाबींवर लक्ष केंद्रित केले**

- सदर याचिकेवर माननीय सर्वोच्च न्यायालयाचे आदेश हे बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांसाठी कशी मार्गदर्शक आहे.
- कोव्हीड १९ महासाथीच्या दरम्यान बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांमध्ये बालकांची पुनर्स्थापना करण्याची प्रक्रिया बालकल्याण समितीच्या समक्ष बालकांच्या पुनर्स्थापनेची प्रकरणे सादर करण्यापूर्वी बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांचे कर्मचारी हे कोव्हीड १९ बाबतच्या काळजीसह सर्व तथ्ये आणि आकडेवारी सह सज्ज असण्यासाठी त्यांनी कळीच्या बाबींची तपास सूची त्यांनी विशद केली.

**केईएम रुग्णालयाच्या न्यायवैद्यक विभागाचे प्रमुख डॉक्टर हरीश पथक यांनी खालील प्रमाणे सांगितले**

- बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांमध्ये आरोग्य, स्वच्छता, निर्जंतुकीकरण प्रक्रिया, मुखपट्ट्या वापरणे, सामाजिक अंतर इत्यादी उपाययोजनाच्या सोबतच टाळेबंदीच्या दरम्यान आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थितीला प्रतिसाद देताना प्रतिबंधात्मक उपाययोजना व सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब.
- मर्यादित कर्मचाऱ्यांच्या आणि संसाधनांच्या बळावर बालकांची देखभाल करणाऱ्या संस्था चालविण्यातील अडचणी आणि अनेक बालके एकमेकांच्या जवळून संपर्कात असतात. त्यामुळे एक समाज म्हणून वाढत्या संस्थात्मकीकरणापासून दूर गेले पाहिजे, आणि पुनः एकत्रीकरण व दत्तक संगोपन असे उपाय स्वीकारले पाहिजेत.
- बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थेत दाखल बालकांना सद्य परिस्थितीबाबत आणि त्यांच्यावर व समाजावर होणाऱ्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रभावाबाबत संवेदित करणे गरजेचे आहे.
- अधिकाऱ्यांच्या शंकांना उत्तर देण्यासाठी व गंभीर परिस्थिती उद्भवल्यास मदतीसाठी राज्याचे हेल्प लाईन क्रमांक देण्यात यावेत.

**महिला व बाल कल्याण विभागाचे पुणे येथील उपायुक्त श्री रवी पाटील यांनी त्यांच्या विभागाचे प्रतिनिधित्व केले व खालील अपेक्षा व्यक्त केल्या**

- कोव्हीड १९ संबंधित जोखिमी व प्रतीबंधांबाबत बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांशी चर्चा करण्यासाठी नियमित दृकश्राव्य चर्चासत्रे टाळेबंदीच्या पश्चात अनुपालन करावयाच्या दिशानिर्देशांबाबत त्यांनी सहभागी व्यक्तींना प्रशिक्षित केले.
- टाळेबंदीच्या पश्चात अधिकाऱ्यांनी द्वारपालनाची म्हणजेच अभ्यागतांच्या येण्याजाण्याच्या बाबत योग्य प्रक्रिया अवलंबली पाहिजे.

**२. महिला व बाल विकास विभागाच्या महाराष्ट्र राज्य बालक संरक्षण संस्थेच्या कार्यक्रम व्यवस्थापक श्रीमती मनीषा बिरारीस यांनी खालील प्रमाणे मतप्रदर्शन केले :-**

"महासाथीच्या कालावधीत बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांमधील अनुशासन, सुरक्षा व सुरक्षितता अबाधित ठेवण्यात महिला व बाल विकास विभागाच्या आघाडीच्या कार्यकर्त्यांनी कळीची भूमिका निभावली असून सदर जबाबदारी निभावण्यासाठी जशी गरज असेल त्याप्रमाणे उपलब्ध असते. सदर टाळेबंदीत नवीन बदलांना सामोरे जाण्याची आपण तयारी करत असताना बाल न्याय अधिनियम, शैक्षणिक गरजा, आरोग्य सुविधा, बालके हाताळण्यासाठी स्वतःचा दृष्टीकोन समजून घेणे, बालकांचे सुरक्षितता विषयक प्रश्न, बालकामगारांसारख्या सामाजिक समस्यांचे परिस्थितीजन्य विश्लेषण, याबाबत सर्वांगीण अभिमुखन व वैधानिक पाठबळ हे बालकांच्या प्रभावी सुरक्षिततेसाठी आवश्यक आहे. आघाडीवरील कार्यकर्त्यांनी बालन्याय अधिनियमाच्या अंमलबजावणीची चौकट व राज्य तसेच जिल्हा स्तरावरील रणनीती खोलवर समजून घेणे आवश्यक आहे. जबाबदारीच्या पदांवर कार्यरत असल्यामुळे बालकल्याण समित्या, बालन्याय मंडळे, जिल्हा कार्यालये, जिल्हा बालक संरक्षण समित्या, विधी सहायता केंद्रे व अन्य व्यवस्थापन समित्यांमध्ये संपर्काचे जाळे त्यांनी प्रस्थापित केले पाहिजे. अशा नियमित प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांसाठी निकषांची योग्य अंमलबजावणी करण्यात मदत होईल."

➢ **प्रश्नोत्तराचे वेबिनार**

**बालकांच्या सुरक्षिततेशी संबंधित पदाधिकाऱ्यांना सर्वोत्तम मार्गदर्शक सूचना व दिशानिर्देशांवर चर्चा व विचारविनिमय करण्यासाठी सदर प्रशिक्षण कार्यक्रमांच्या मंचाचा अतिशय उत्तम उपयोग झाला आणि टाळेबंदीनंतरच्या नवीन सर्व सामामान्य परिस्थितीशी जुळवून घेण्यात त्यांना मदत झाली.**




**६. दिनांक २७ व २८ जुलै २०२० रोजी बालकांची देखभाल करणाऱ्या संस्था व अन्य बालक संरक्षण पदाधिकाऱ्यांच्या शिक्षण, आरोग्य व बाल न्याय अधिनियम विषयक प्रशिक्षण कार्यक्रमातील क्षणचित्रे**

**६.१.** महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने आंतरराष्ट्रीय न्याय अभियानाच्या भारतातील शाखेच्या सहयोगाने बालकांची देखभाल करणाऱ्या संस्था व अन्य बालक संरक्षण पदाधिकाऱ्यांसाठी शिक्षण, आरोग्य व बाल न्याय अधिनियम या विषयावर एक प्रश्नोत्तर स्वरूपाचे दोन दिवसांचे वेबीनार आयोजित केले होते. दिनांक १६ जूनच्या प्रशिक्षण कार्यक्रमानंतर त्यात सहभागी झालेल्या बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांच्या कार्यकर्त्यांमध्ये अनेक शंका व प्रश्न निर्माण झाले आणि महासाथीच्या प्रेरित टाळेबंदीतील मार्गदर्शक तत्वे व दिशानिर्देशांचे सुरळीत व प्रभावी कार्यान्वयन होण्यासाठी आयोगाने सदर प्रश्नोत्तर वेबीनार आयोजित केला होता.

दिनांक २७ जुलै २०२० रोजी वेबीनारच्या पहिल्या दिवशी महिला व बाल विकास, न्याय, शिक्षण व आरोग्य विभाग तसेच बिगर शासकीय संघटनांमधील तज्ञांच्या समितीसोबत प्रश्नोत्तर सत्रे झाली. महिला व बाल विकास विभागाच्या राज्य भरातील कार्यालयांमधून ६०० व्यक्ती वेबीनारला उपस्थित होत्या. दिनांक २८ जुलै २०२० रोजी वेबीनारच्या दुसऱ्या दिवशी शिक्षण आणि आरोग्य या विषयावरील सत्रे समाविष्ट होती आणि त्यामध्ये ५६० जण सहभागी झाले होते. महिला व बाल विकास, न्याय, शिक्षण व आरोग्य विभाग तसेच बिगर शासकीय संघटनांमधील तज्ञांच्या समितीसोबत प्रश्नोत्तर सत्रे झाली.

**पहिला दिवस**

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्री ॲडव्होकेट श्रीमती यशोमती ठाकूर यांनी वेबीनारचे उद्‌घाटन केले. बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांमधील बालकांच्या सुरक्षिततेची खातरजमा करण्यासाठी व आव्हाने हाताळण्यासाठी सर्वांनी एक करुणामय व सक्रीय दृष्टीकोन स्वीकारण्याची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश माननीय श्री व्ही एम कानडे यांनी त्यांच्या उद्‌घाटनपर भाषणात बाल हक्क ही निरंतर प्रक्रिया असल्याचे प्रतिपादन केले. सन २०१५ चा बाल न्याय अधिनियम हा अपराधिक न्याय प्रणाली, बालकांची देखभाल, सुरक्षितता व दत्तक घेण्यावर समग्र पद्धतीने प्रभावित करणारा सर्वसमावेशक अधिनियम आहे. "मात्र बालकांचे कल्याण हे अधिनियमाचे प्रमुख उद्दिष्ट असून त्यामध्ये काही विशिष्ट बाबी अधिक स्पष्ट होण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्राच्या महिला व बाल विकास विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती आय. ए. कुंदन यांनी बाल न्याय अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणी साठी अशा वेबीनार व विचारविनिमयाची गरज असल्याकडे लक्ष वेधले. " लाभार्थ्यांना सर्वोत्तम सेवा मिळण्याची खातरजमा करण्यासाठी सद्य अधिनियम करण्यामागील विधिमंडळाचे उद्दिष्ट पूर्णपणे समजून अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. बालकांचे हित जपले जाईल अशा पद्धतीने सर्व हितसंबंधीयांच्या सूचना, कल्पना व दृष्टीकोनानुसार बालकांची देखभाल करणाऱ्या सर्व संस्थांमधील बालकांचे संरक्षणाची खातरजमा करण्याची सर्वांची सामुदायिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

दिनांक १६ जूनच्या प्रशिक्षण कार्यक्रमानंतर त्यात सहभागी झालेल्या बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांच्या कार्यकर्त्यांमध्ये बालकांची घ्यावयाची काळजी आणि संस्थांनी आपले कामकाज प्रभावी पद्धतीने करण्याबाबत निर्माण झालेल्या अनेक शंकांचे निरसन व प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी आयोगाने महिला व बाल विकास विभागाच्या माननीय मंत्री श्रीमती यशोमती ठाकूर यांच्या पाठबळाने बाल न्याय अधिनियमाच्या संदर्भातील सदर प्रश्नोत्तर वेबीनार आयोजित केला असल्याचे महाराष्ट्र बाल हक्क्क संरक्षण आयोगाच्या सदस्य सचिव व भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी श्रीमती सीमा व्यास यांनी सांगितले.

आंतरराष्ट्रीय न्याय अभियानाच्या परिचालन संचालक श्रीमती मेलिसा वालावलकर यांनी बाल न्याय अधिनियम पुरोगामी असल्याचे व त्याच्या अंमलबजावणीसाठी सहयोग करण्याचे आवाहन केले. प्रलंबित प्रकरणे, पायाभूत सुविधा किंवा बालकांना हाताळण्यासाठी बालकस्नेही अभिमुखन, कर्मचाऱ्यांची क्षमता बांधणी, पुनर्मिलनातील तफावती भरून काढण्यासाठी कायदेशीर साहाय्य सेवा, बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांसाठी अद्ययावत आणि बाल न्याय प्रणालीत बालकां देखभालीसाठी प्रभावी व शाश्वत उपाययोजना – या बाबींवर आपण लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

**वेबीनार मध्ये वेगवेगळ्या क्षेत्रातील प्रतिष्ठित वक्त्यांना पाचारण करण्यात आल्यामुळे सर्व मुद्द्यांवर सर्वसमावेशक विचारविनिमय होण्याची काळजी घेण्यात आली प्रतिष्ठित वक्ते खालीलप्रमाणे :**

प्रेरणा संस्थेच्या सहसंस्थापक व संचालक श्रीमती प्रीती पाटकर यांनी सदर सत्रात बाल कल्याण समितीचे अंतिम आदेश, नुतनीकरण आदेश, मुक्तीपूर्व प्रक्रियेची माहिती, दाखल करण्याचे आदेश व बालकांची देखभाल करणाऱ्या संस्था व बाल कल्याण समित्यांच्या प्रक्रियांशी संबंधित अन्य शंकांचे निरसन व प्रश्नांना उत्तरे दिली.

महाराष्ट्राच्या महिला व बाल कल्याण विभागाचे उपायुक्त श्री रवी पाटील यांनी बाल न्याय अधिनियमाची अंमलबजावणी, व प्रशासकीय दृष्टीकोनातून बालकल्याण समित्या, बाल न्याय मंडळे व बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांचे प्रभावी पद्धतीने कामकाज याबाबत विचारलेल्या शंकांचे निरसन व प्रश्नांना उत्तरे दिली.

मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती माननीय श्री विद्याधर कानडे यांनी बाल न्याय अधिनियमातील कायदेशीर तरतुदी हा विषय हाताळून बालकाच्या सर्वोत्तम हितासाठी अधिनियमातील विविध कलमांची अर्थउकल करून त्याची अंमलबजावणी कशी करता येईल यावर तपशीलवार विवेचन केले.

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या प्रशासकीय अधिकारी डॉक्टर मंजुषा कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले व कोव्हीड १९ महासाथीमध्ये मुलांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी शाश्वत उपाययोजना समजून घेण्यासाठी सहभागी व्यक्तींनी एकात्मिक संवाद व चर्चा तसेच सामुहिक सामंजस्य ठेवण्यास प्रोत्साहन दिले.

**दुसरा दिवस**

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल कल्याण विभागाच्या मंत्री माननीय ॲडव्होकेट श्रीमती यशोमती ठाकूर यांनी वेबीनारचे पुन्हा उद्‌घाटन केले आणि महासाथीच्या कालावधीत आरोग्य व शिक्षणावर भर दिला. बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांमधील बालकांना सुरक्षित व संरक्षित ठेवण्याची जबाबदारी राज्याची आहे. आरोग्य व संरक्षण हे प्राधान्याचे विषय असून बालकांना सद्य परिस्थितीचा ताणतणाव न येत त्यांना त्यांच्याच संस्थेत निरंतर शिक्षण व आरोग्य सुविधा मिळण्यासाठी विभाग सातत्याने प्रयत्न करीत असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधीश माननीय श्रीमती सुजाता मनोहर यांनी त्यांच्या उद्‌घाटनाच्या भाषणात बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांमधील बालकांच्या कल्याणाची जबाबदारी राज्यावर असल्याचे नमूद केले. बालन्याय अधिनियमाची अंमलबजावणी व्यवस्थित होण्यासाठी अंतर विद्याशाखीय दृष्टीकोन असण्याची आणि महिला व बाल कल्याण विभाग, बाल कल्याण संस्था, बिगर राज्य संस्था समुदाय व बालकांकडून समंजस निवेष्टीची गरज व्यक्त केली. बालकांच्या सर्व गरजा पूर्ण होऊन कायदेशीर चौकटीत त्यांच्या मुलभूत मानवी अधिकारांचे खात्रीपूर्वक संरक्षण करणे ही आपणा सर्वांची प्राथमिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

आंतरराष्ट्रीय न्याय अभियानच्या परिचालन संचालक श्रीमती मेलिसा वालावलकर यांनी करोना १९ सारख्या आव्हानात्मक कालावधीत बालकांच्या सुरक्षितता व संरक्षणावर भर दिला. बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांमधील बालकांच्या मानसिक स्वास्थ्याला प्रोत्साहन देतानाच त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, ऑनलाईन अध्ययन सेवा, आकाशवाणी व शिक्षकांशी ऑनलाईन संवाद सहजगत्या उपलब्ध असणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. बालके आणि त्यांचे शिक्षण व आरोग्याची प्रभावी पद्धतीने हाताळणी करण्यासाठी बहुमुखी दृष्टीकोन स्वीकारण्यासाठी राज्यातील यंत्रणेला मदत करण्यास आंतरराष्ट्रीय न्याय अभियान सर्वोच्च प्राधान्य देईल असे त्यांनी सांगितले.

**वेबीनार मध्ये वेगवेगळ्या क्षेत्रातील प्रतिष्ठित वक्त्यांना पाचारण करण्यात आल्यामुळे सर्व मुद्द्यांवर सर्वसमावेशक विचारविनिमय होण्याची काळजी घेण्यात आली प्रतिष्ठित वक्ते खालीलप्रमाणे :**

सार्वजनिक आरोग्य विभागातील अधिकारी डॉक्टर अर्चना पाटील यांनी या सत्रामध्ये बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांनी त्यांच्याकडे दाखल असलेल्या बालकांमध्ये कोव्हीड १९ चा प्रसार न होण्यासाठी बालकांच्या मुलभूत स्वच्छता, आरोग्य याबाबतच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण विभागातील अधिकारी श्री विकास गरड यांनी ऑनलाईन शिक्षण व माध्यमांच्या बाबत विविध शंकांचे निरसन व प्रशांना उत्तरे दिली. तसेच बालके नेहमी प्रेरित राहण्यासाठी व त्यांना विविध माध्यमातून शिक्षण मिळण्यासाठी राज्याच्या शिक्षण विभागाने पुरविलेल्या विविध साधनांची व तरतुदींची माहिती दिली.

महाराष्ट्राच्या महिला व बाल कल्याण विभागातील उपायुक्त श्री रवी पाटील यांनी त्यांच्या सत्रात बालकल्याण समित्या, पाठबळ देणाऱ्या बिगर शासकीय संघटना व बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांच्या विविध प्रशासकीय अडचणी व मुद्द्यांचे निराकरण केले.

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या प्रशासकीय अधिकारी डॉक्टर मंजुषा कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले व कोव्हीड १९ महासाथीमध्ये मुलांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी शाश्वत उपाययोजना समजून घेण्यासाठी सहभागी व्यक्तींनी एकात्मिक संवाद व चर्चा तसेच सामुहिक सामंजस्य ठेवण्यास प्रोत्साहन दिले .

**७. दिनांक १२ सप्टेंबर, २०२० बालकांच्या विरुद्ध लैंगिक गुन्हे प्रतिबंधक अधिनियमामध्ये सन २०१९ मध्ये झालेल्या दुरुस्त्या व कोव्हीड १९ दरम्यान त्यांच्या प्रभावी अंमलबजावणी वर वेबीनार**

**७.१ :-** महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग व आंतरराष्ट्रीय न्याय अभियानाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १२ सप्टेंबर २०२० रोजी बालकांच्या विरुद्ध लैंगिक गुन्हे प्रतिबंधक अधिनियमामध्ये सन २०१९ मध्ये झालेल्या दुरुस्त्या व कोव्हीड १९ दरम्यान त्यांच्या प्रभावी अंमलबजावणी वर वेबीनार ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आला होता आणि सदर प्रशिक्षणात विविध क्षेत्रातील ५६० व्यक्ती सहभागी झाल्या होत्या. तसेच सुमारे २७०० लोकांनी सदर vebinar फेसबुकवर ऑनलाईन पाहिले

**७.२ उद्दिष्टे :-** टाळेबंदी दरम्यान व त्या नंतर बालकांच्या विरुद्ध लैंगिक गुन्हे अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीतील येणाऱ्या समस्यांवर मात करण्यासाठी उपाययोजना शोधण्यासाठी विविध शासकीय यंत्रणांशी सहयोग करण्याचे सदर वेबिनारचे उद्दिष्ट आहे. महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महिला व बाल विकास विभाग, कायदा व न्याय विभाग व पोलीस यांच्या दरम्यान यशस्वी अभिसरण होऊन छळ होणाऱ्या बालकांचे संरक्षण कसे करता येईल आणि त्यांच्या विरुद्ध होणारे एकूण गुन्हेच कसे रोखता येतील यावर विचारविनिमय करण्यासाठी एकाच व्यासपीठावर आले होते.

**७.३ वेबीनारची क्षणचित्रे**

महिला व बाल विकास विभागाच्या मंत्री माननीय ॲडव्होकेट श्रीमती यशोमती ठाकूर यांनी न्यायमूर्ती जाधव आणि न्यायमूर्ती कानडे व पोलीस विभागासह विविध विभागाच्या अन्य सभासदांचे हार्दिक स्वागत केले आहे. बालकांचे हक्क हा महत्वाचा विषय असल्यामुळे सदर वेबीनार आयोजित केल्याबद्दल त्यांनी आपल्या विभागाचे आभार मानले. शासन आणि अनेक बिगर शासकीय संघटना अतिशय महत्वाची भूमिका निभावत असतात. महासाथीच्या दरम्यान बालकांच्या मुलभूत हक्कांची काळजी घेणे अवघड आहे. त्यामुळे सदर कामात सहभागी असलेल्या प्रत्येक विभाग आणि व्यक्तीने एक होऊन काम करणे आवश्यक आहे. वेबीनार मध्ये व्यक्त झालेला प्रत्येक शब्द महत्वाचा आहे. त्यांनी प्रत्येक सहभागी व्यक्तीचे आणि हितसंबंधीयांनी आपले अभिप्राय आणि सूचना केल्याबद्दल आभार मानले आणि त्या प्रत्येक अभिप्राय आणि सूचना विचारात घेण्याचे आश्वासन दिले.

➢ **आंतरराष्ट्रीय न्याय अभियानाच्या परिचालन संचालिका श्रीमती मेलीस्सा वालावलकर यांनी महासाथीच्या कालावधीत बालकांच्या वाढत्या ऑनलाईन शोषणाची चर्चा करून हा कल अस्वस्थ करणारा असल्याचे सांगितले. महिला आणि बालकांच्या विरुद्धच्या सायबर गुन्ह्यांमध्ये २००% वाढ झाल्याचे केरळ सायबर डोमने उघड केलेल्या माहितीवरून दिसत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. त्यांनी खालील बाबींवर भर देण्याची गरज व्यक्त केली.**

- शोषण झालेल्या आणि होत असलेल्या प्रत्येक बालकाची काळजी घेण्यासाठी सर्जनशील व सहयोगाने कार्य करणे. आपण व्यवस्थेचा भाग असल्यामुळे बालके आपल्यावर अवलंबून आहेत.

- बालकांना बालस्नेही आणि गोपनीय पद्धतीने ऑनलाइन पद्धतीने तक्रार करता येईल आणि खटल्यांचे कामकाज ऑनलाईन चालविता येईल अशी यंत्रणा तयार करणे.
- कोव्हीड १९ च्या दरम्यान नवीन सामान्य परिस्थितीला स्वीकारण्यासाठी प्रक्रिया आणि दिशानिर्देश. गुन्हेगारी स्वरूपाचे साहित्य अपलोड करणाऱ्या आणि ते विविध व्यक्तींना अग्रेषित करणाऱ्या तसेच ऑनलाईन उपलब्ध करून देणाऱ्या मंचांवर शासन आणि तपास यंत्रणांनी देखरेख ठेवण्याची गरज .
- गुन्ह्यांचे स्वरूप आणि त्यांच्याशी संबंधित कायदे व्यवस्थित समजून घेणे.
- सायबर जगत आणि गुन्ह्यांसाठी कायदेशीर धोरण आणि नियामक बाबी. स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अभिसरण साधून पीडितांना अधिक चांगले सहाय्य करणे व सर्वोत्तम पद्धतींचा स्वीकार करणे .

➢ **मुंबई उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायाधीश माननीय श्रीमती साधना जाधव यांनी बालकांचे संरक्षण करण्यासाठी पारित करण्यात आलेली बालकांच्या विरुद्ध लैंगिक गुन्हे प्रतिबंध अधिनियमाच्या पार्श्वभूमीची कुळकथा सांगितली. कलम ३५४ मध्ये दंडात्मक तरतूद केली असली तरीही त्या कलमात “ महिला ” हा शब्द वापरल्यामुळे ते कलम शोषित बालकांना लागू करणे अवघड होते. त्यामुळे बालकांच्या अधिकारांना अधिमान्यता देणारे आणि पिडीतांसाठी एक वेगळे साधन ठरू शकेल असा मंच निर्माण करण्याची गरज होती.**

- अठरा वर्षांपेक्षा कमी वय असलेली कोणतीही व्यक्ती बालक असल्याची विनिर्दिष्ट तरतूद बालकांच्या विरुद्ध लैंगिक गुन्हे प्रतिबंध अधिनियमात करण्यात आली आहे. अधिनियमातील प्रस्तावित चार दुरुस्त्यांचे स्वरूप आणि बालकांच्या विरुद्ध गुन्हे करणाऱ्या अपराध्याला अधिक शिक्षेची तरतूद त्यांनी अधिक स्पष्ट केली. कोव्हीड १९ सारख्या नैसर्गिक आपत्तीत बालकांच्या होणाऱ्या शोषणाशी ते संबंधित आहे. भेदक स्वरूपाचा लैंगिक अत्याचार, ऑनलाईन लैंगिक शोषण आणि अश्लील बालसाहित्य यासंबंधीच्या शिक्षा अधिक कठोर करण्यात आल्या आहेत. बदलत्या काळानुसार सामाजिक माध्यमात बालकांना आणि गुन्हे करणाऱ्या व्यक्तींना जे प्रकार बघण्यासाठी आणि अनुकरण करण्यासाठी सहज उपलब्ध आहेत, त्याचा विचार करता ही दुरुस्ती गरजेची होती. गुन्ह्यात आपले निर्दोषत्व सिद्ध करण्याचे उत्तरदायित्व गुन्हेगार किंवा आरोपित व्यक्तीवर ठेवण्यात आले आहे.
- भेद्य बालकांना न्याय मिळवून देण्याची या अधिनियामामागील भावना आहे. The spirit of the Act which is to give justice to vulnerable children. उलटणाऱ्या प्रत्येक पिडीतासमोरील परिस्थितीची उकल करताना न्यायव्यवस्थेने महत्वाची भूमिका निभावली पाहिजे. जरी पिडीत बालक साक्ष देताना उलटला तरीही परिस्थितीजन्य पुराव्याच्या आधारे न्यायव्यवस्था आरोपितांना दोषी ठरवू शकते. प्रथम खबर अहवाल नोंदविल्यावर फौजदारी प्रक्रिया कलम १६४ अन्वये पिडीत व्यक्तीचा जबाब सत्वर नोंदविण्याची काळजी घेण्याचा सल्ला त्यांनी पोलीस विभागाला दिला.
- बालकांच्या विरुद्ध गुन्हे करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध गुन्हे दाखल करण्याची प्रत्येक व्यक्तींवर टाकण्यात आली आहे. त्यामध्ये गुन्हेगारांना प्रमाणशीर शिक्षा झाली पाहिजे. न्यायाधीकाऱ्यांनी संतुलित दृष्टीकोन ठेवण्याची आवश्यकता आहे. बलात्कार करणाऱ्या गुन्हेगाराला कठोर शिक्षा दिली पाहिजे आणि त्याला संशयाचा कोणताही फायदा देता कामा नये.

➢ **मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश माननीय श्री.व्ही.एम.कानडे यांनी अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी व्यवहार्य दृष्टीकोन स्वीकारण्याची गरज व्यक्त केली. सन १९९५ मध्ये बीजिंग येथे झालेल्या परिषदेत महिला व बालकांच्या हक्कांची चर्चा करण्यात आली आणि त्यांना मानवाधिकार म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता देण्यात आली. भारताने सदर आंतरराष्ट्रीय साविदेवर स्वाक्षरी केली आहे. यामुळे गुन्हेगारी न्यायशास्त्रातील विचलनाबाबत तरतुदीचे दोन महत्वाचे पैलू समोर येतातः-**

अ) अल्पवयीन गुन्हेगारांच्या खटल्यांचे कामकाज आणि

ब) अत्याचाराने पिडीत बालके. अत्याचाराने पिडीत बालकांच्या बाबतीत संविदेतील तरतुदींचे पालन होत नसल्याची उणीव आढळून आली. याचीच परिणीती सन २०१२ मध्ये बालकांच्या विरुद्ध लैगिक गुन्हे प्रतिबंध अधिनियम पारित होण्यात झाली.

अधिनियमाच्या कलम ३८ मध्ये दुरुस्ती करून आपल्या मानसिक स्थिती सिद्ध करण्याची जबाबदारी आता आरोपित व्यक्तीवर ठेवण्यात आली आहे. ही एक महत्वाची तरतूद आहे. “ न्याय शास्त्राने आता जिज्ञासू दृष्टीकोन स्वीकारला असून आपण निर्दोष असल्याचे सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपित व्यक्तीवर ठेवण्यात आली आहे. “ आरोप सिद्ध करण्याची जबाबदारी अभियोग पक्षावर असते, हा शिरस्ता येथे उलटवण्यात आला आहे.

**कोव्हीड १९ मुळे न्यायालयातील खटल्यांच्या कामकाजावर विपरीत परिणाम झाला असून प्रलंबित प्रकरणांचे प्रमाण वाढले आहे. बालकांना संरक्षण देण्याच्या आणि न्याय मिळवून देण्याच्या उद्देशाने काही सूचना खालील प्रमाणे आहेत :**

- प्रकरणाचे प्रतिवेदन आणि ऑनलाईन प्रक्रियेसाठी नवीन पद्ध सूत्रबद्ध करण्याची गरज असल्याचे त्यांनी सुचविले.
- वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कोव्हीड १९ च्या रुग्णांची काळजी घेण्याचा अतिरिक्त भार असला तरीही वैद्यकीय प्रक्रियेची अनिवार गरज असून पिडीत व्यक्तींना वैद्यकीय मदत , सहाय्य प्राधान्याने देणे आवश्यक आहे.
- टाळेबंदी नंतर खटल्यांचे कामकाज बालकस्नेही पद्धतीने होण्यासाठी उपाययोजना केली पाहिजे. त्यामध्ये बालकस्नेही न्यायालयीन दालने व इमारती उभारणे समाविष्ट आहेत.
- बालकांचे गुन्ह्यांपासून संरक्षण करण्यासाठी आणि संबंधित मुद्यांचे निराकरण करण्यासाठी वेबीनार सारखे अभिसरण साधणारे उपाय सातत्याने योजले पाहिजेत.

➢ **पुढील वाटचाल :**

- प्रथम खबर अहवालाची ऑनलाईन नोंदणी करता येईल अशी नवीन प्रणाली किंवा यंत्रणा सूत्रबद्ध करणे
- ऑनलाईन गुन्ह्यांचे स्वरूप आणि त्याचे निराकरण करणारी यंत्रणा अधिक चांगल्या पद्धतीने समजावून घेणे आवश्यक आहे.
- गुन्हे घडणाऱ्या जागांवर पोलिसांनी विशेष लक्ष ठेवण्याची गरज असून आवश्यकता भासल्यास स्थानिक बिगर शासकीय संस्थांशी सहयोग करावा .
- महासाथ असली तरीही बालकांच्या लैंगिक शोषणाशी संबंधित गुन्ह्यांमध्ये आरोपपत्र वेळेवारी दाखल करावे .
- लैंगिक शोषित बालकांना प्राधान्य मिळेल याची वैद्यकीय अधिकाऱ्यांनी खातरजमा करण्याची गरज आहे.
- प्रथम खबर अहवालाची नोंद झाल्यावर फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६४ अन्वये पिडीत व्यक्तीचा जबाब शक्य तितक्या लवकर नोंदविणे आवश्यक आहे.
- खटल्यांचे कामकाज ऑनलाईन करण्यासाठी नवीन प्रक्रिया व दिशानिर्देश विहित करण्याची गरज आहे.
- पिडीत व्यक्तीला अंतरिम नुकसानभरपाई विनाविलंब देणे आवश्यक आहे.
- पिडीत व्यक्तीच्या वैद्यकीय, मौद्रिक, मानसिक किंवा सामाजिक गरजांची शक्य तेवढी उत्तम पद्धतीने काळजी घेतली पाहिजे.
- न्यायालयात जामीन अर्ज आणि कोठडीबाबत अर्ज सादर करण्याच्या बाबतीत पिडीत व्यक्तीची बाजू विचारात घेण्यासाठी उपाययोजना झाल्या पाहिजेत आणि बालकल्याण समितीच्या अहवालाचा देखील विचार झाला पाहिजे.
- न्यायालयांच्या इमारती बालकस्नेही पद्धतीने बांधण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. बालकस्नेही मुलभूत सुविधा आणि पिडीतस्नेही प्रक्रिया पद्धती आवश्यक आहेत.

बालकांवरील गंभीर गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी आणि लैंगिक शोषणापासून बालकांचे संरक्षण करण्यासाठीच्या मार्गदर्शक तत्वे आणि दिशानिर्देशांवर चर्चा व विचारविनिमय करण्यासाठी वेबीनार हा सर्वोत्कृष्ट मंच होता. सर्व हितसंबंधीयांना एकाच मंचावर आणणे या वेबीनार मुळे शक्य झाले आणि कोव्हीड १९ सारख्या विशेष परिस्थितीत पीडितांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी सर्व शासकीय आणि बिगर शासकीय संस्थांनी हातात हात घालून काम करणे आवश्यक आहे यावर सर्वांचे एकमत झाले.

**८. दिनांक २६ सप्टेंबर, २०२०**

**२६ सप्टेंबर २०२० रोजी "POCSO कायद्यातील 2019 सुधारणा आणि त्याची COVID-१९ दरम्यान प्रभावी अंमलबजावणी" या विषयावर प्रश्नोत्तरे वेबिनार :-**

महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग (MSCPCR) आणि आंतरराष्ट्रीय न्याय मिशन (IJM) यांनी १२ सप्टेंबर २०२० रोजी "POCSO कायद्यातील २०१९ सुधारणा आणि कोविड-१९ दरम्यान त्याची प्रभावी अंमलबजावणी" या वेबिनारचा पहिला टप्पा आयोजित केला होता. POCSO कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीदरम्यान आणि लॉकडाऊन नंतरच्या काळात येणाऱ्या समस्यांचा सामना करण्यासाठी यंत्रणा तयार करण्यासाठी विविध सरकारी भागधारकांशी सहकार्य करणे. वेबिनारची उद्दिष्टे आणि उद्दिष्टांमुळे, वेबिनारचा

दुसरा टप्पा २६ सप्टेंबर २०२० रोजी यशस्वीरित्या आयोजित करण्यात आला. MSCPCR, DWCD, CWCs, JJBs, न्यायपालिका आणि पोलीस यांच्यात एक मंचावर एकत्र येऊन अत्याचाराला सामोरे जाणाऱ्या मुलांचे संरक्षण कसे करता येईल आणि गुन्हेगारी पूर्णपणे कशी रोखता येईल यावर विचारमंथन करण्यासाठी एकत्र आले. शिवाय, वेबिनारमध्ये सुमारे ३७ जिल्हे, गोव्यातील २ जिल्हे आणि दमण, दीव आणि सिल्वासा या केंद्रशासित प्रदेशातील अनुक्रमे फलदायी सहभाग दिसला ज्यामध्ये नामनिर्देशित प्रतिनिधी आणि न्यायाधीशांनी POCSO कायदा आणि त्याच्या अंमलबजावणीबाबत प्रश्न, सूचना आणि अंतर्दृष्टी पाठवली. या प्रश्नांची आणि सूचनांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने वेबिनारचा दुसरा टप्पा सुरू करण्यात आला. तज्ञ पॅनेलच्या सदस्यांनी त्यांचे कौशल्य सादर केले आणि उपस्थित केलेल्या समस्यांचे निराकरण केले. ऑनलाइन प्रशिक्षणात विविध क्षेत्रातील सुमारे ५६० सहभागींची उपस्थिती होती. हा वेबिनार फेसबुकवरही लाइव्ह होता आणि २७०० लोकांनी पाहिला होता.

**टीप :- प्रश्न उत्तराची सविस्तर माहिती साठी खालील लिंक चा वापर करावा –**

https://www.facebook.com/Maharashtra-Child-Rights-Commission-and-IJM-108815477577261

**पुढील वाटचाल**

१. POCSO प्रकरणांमध्ये दोष सिद्ध होण्यासाठी प्रक्रियात्मक तपास अत्यंत महत्त्वपूर्ण आहे

२. बालस्नेही न्यायालयांची गरज आहे आणि त्यांची गरज पूर्ण करण्यासाठी सरकार आणि न्यायपालिका एकत्र येण्याची गरज आहे.

३. केस मॅनेजमेंट, कोर्ट मॅनेजमेंट आणि कायद्याची अंमलबजावणी या गोष्टी कायद्यानुसार पूर्णपणे वेळेवर होण्यासाठी आवश्यक आहेत.

४. पीडितांसाठी अनुकूल प्रथा टिकवून ठेवण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे, कॅमेरा प्रक्रियेत आवश्यक आहे.

५. विरोधी साक्षीदारांना सामोरे जावे लागेल, आणि केवळ पीडितेच्या वैमनस्यामुळे केस निर्दोष होऊ नये.

६. पीडित नुकसान भरपाई जलद वितरीत करण्यासाठी पोलिसांनी वेळेवर DLSA ला सूचित केले पाहिजे

७. बळीची गोपनीयता अत्यंत महत्वाची आहे. पीडितेची गोपनीयता राखण्याची गरज आहे.

८. पोलिसांनी वेळेवर CA आणि FSL नमुने न्यायालयात सादर करणे आवश्यक आहे. पोलिसांनी न्यायालयासमोर प्रामाणिक तथ्ये मांडली पाहिजेत आणि सविस्तर तपास केला पाहिजे.

९. मुलांचे संरक्षण करण्याच्या सामान्य कारणासाठी काम करणाऱ्या सर्व व्यक्तींमध्ये अधिक अभिसरण आणि संभाषणाची गरज आहे.

## समारोप

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाद्वारे झालेल्या कोव्हीड १९ आंतरनिरासनामुळे सक्रीय व अद्ययावत मनुष्यबळ निर्माण झाले असून अशा असाधारण परिस्थिती हाताळताना सर्व प्रकारची खबरदारी घेण्यात येत आहे. महिला व बाल कल्याण आयुक्तालयाने सदर प्रयत्नांचे महत्व जाणून अहवालात नमूद विविध हितसंबंधीयांना प्रत्यक्ष काम करताना कोणत्या परिस्थिती आणि आव्हानांना तोंड द्यावे लागते याचा विचार केला आणि त्यानुसार सूचना व उपाययोजना केल्या / सुचविल्या .

सदर आंतरनिरासानाच्या माध्यमातून केलेल्या स्पष्टीकरणाद्वारे टाळेबंदी कालावधीत अनुसरायच्या प्रक्रियांबाबत बालकांची देखभाल करणाऱ्या संस्था आणि बाल कल्याण समित्यांसाठी मार्गदर्शन व प्रशिक्षण सत्रे आयोजित करणे आयुक्तालयाला शक्य झाले :

- ११ ऑगस्ट : रोजनामा लिहिण्याबाबत बालकांची देखभाल करणाऱ्या संस्थांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम ( बालकल्याण समित्या व जिल्हा बाल संरक्षण पथकातील १२० व्यक्ती सहभागी )
- १२ ऑगस्ट : सामाजिक तपास अहवाल लिहिण्याबाबत प्रशिक्षण कार्यक्रम ( महिला व बाल कल्याण विभाग, बाल कल्याण समित्या, बिगर शासकीय संस्था व जिल्हा अधिकारी यांच्या पैकी २०० जणांनी झूमवर आणि ४६२ जणांनी फेसबुक द्वारे सहभाग घेतला )
- १३ ऑगस्ट व्याक्तीकात देखभाल योजनेवर प्रशिक्षण कार्यक्रम ( महिला व बाल कल्याण विभाग, बाल कल्याण समित्या, बिगर शासकीय संस्था व जिल्हा अधिकारी यांच्या पैकी २४० जणांनी झूमवर आणि ७४७ जणांनी फेसबुक द्वारे सहभाग घेतला )

- १७ ऑगस्ट : उच्च न्यायालयातील दत्तक प्रकरणाबाबत विशेष बैठक . कोकण विभागाच्या अंतर्गत बाल कल्याण समितीच्या मार्फत उच्च न्यायालयातील प्रकरण आले होते. महिला व बालकल्याण विभागा सोबत झालेल्या बैठकीत बाल कल्याण समितीच्या मार्गदर्शक सदस्यांना आणि प्रकरणी सहभागी सर्व पक्षकारांना पुढील कार्यवाही बाबत चर्चा करण्यासाठी निमंत्रित करण्यात आले होते. ( महिला व बाल कल्याण विभाग, बाल कल्याण समित्या, बिगर शासकीय संस्था व जिल्हा अधिकारी यांच्या पैकी १५ जणांनी सहभाग नोंदविला )
- १८ ऑगस्ट देखभाल गृहोत्तर प्रशिक्षण व जागरुकता कार्यक्रम ( बाल कल्याण समित्या, व बिगर शासकीय संस्था यांच्या पैकी २३७ जणांनी सहभाग नोंदविला )

**प्रकरण ७ नमुना "अ" तक्रारींचा तपशील :-**

सन २०२०- २१ या कालावधीत प्राप्त झालेल्या, निकाली काढलेल्या व प्रलंबित तक्रारींचे विवरण :-

| **वर्ष**<br>(१) | **वर्षाच्या प्रारंभी प्रलंबित प्रकरणे**<br>(२) | **नव्या तक्रारी**<br>(३) | **एकूण**<br>(४) | **निकाली काढलेली प्रकरणे**<br>(५) | **वर्षाखेर**<br>(६) |
|---|---|---|---|---|---|
| २०२० - २१ | ३८९ | १३४ | ५२३ | ३४ | ४८९ |

## प्रकरण ८ ऑडिटरचा अहवाल व ताळेबंद अहवाल :-

लेखा विवरण पत्र महालेखपाल यांना सादर केले आहे. लेखा परीक्षणानंतर ऑडिटेड स्टेटमेंट सभागृहात सादर करण्यात येईल

# MAHARASHTRA STATE COMMISSION FOR PROTECTION OF CHILD RIGHTS, MUMBAI

## ACCOUNTANTS REPORT ON COMPILATION OF UNAUDITED FINANCIAL STATEMENTS

**For the Year Ended**
**31th March 2021**


RATAN RATHI & CO

CHARTERED ACCOUNTANTS,
'KRISHNA NIDHI', NEAR NATRAJ GARDEN,
KHAMGAON 444 303
CONTACT NO.:7722072117
E- MAIL ID: ratan_rathi@rediffmail.com

**RATAN RATHI & COMPANY**
**CHARTERED ACCOUNTANTS**

"KrishanaNidhi",Near Natraj Garden,
Khamgaon (Dist Buldhana) - 444303
Ph: 7722072117, 9422180005

Date:02-01-2025

# ACCOUNTANTS REPORT ON COMPILATION OF UNAUDITED FINANCIAL STATEMENTS

To,
The Hon, Administrative Officer
MSCPCR
Worli, Mumbai

On the basis of the accounting records and other information and explanation provided to us by the management, we have complied the unaudited balance sheet of MSCPCR Worli, Mumbai as on March 31, 2021 and the related Income & Expenditure Account and Receipts & Payments Accounts for the period then ended.

The management of the Administrator Worli, Mumbai- MSCPCR is responsible for

A. Completeness and accuracy of the underlying data and complete disclosure of all material and relevant information to the accountant.

B. Maintaining adequate accounting and other records and internal and selecting and applying appropriate accounting policies.

C. Preparation and presentation of financial statements in accordance with applicable laws and regulations, if any.

D. Establishing controls to safeguard the Assets of entity and preventing and detecting frauds or other irregularities.

E. Establishing controls for ensuring that the activities of the entity are carried out in accordance with applicable laws and regulations and preventing and detecting any non-compliance.

The compilation engagement was carried out by us in accordance with standard on Related Services (SRS) 4410" Engagement to compile Financial Information" issued by the Institute of Chartered Accountants of India.

The Balance sheet and Income & Expenditure Account are in agreement with the books of accounts subject to our notes and remarks. We have not audited or reviewed these financial statements and accordingly we do not express an opinion thereon.

For Ratan Rathi& Co
Chartered Accountants

RATAN RATHI & CO. Chartered Accountants F.R.No.108698W Near Natraj Garden, Khamgaon

CA Ratan Rathi
Partner
Membership No.: 036429

# MAHARASHTRA STATE COMMISSION FOR PROTECTION OF CHILD RIGHTS,MUMBAI
## 3RD FLOOR , TRANSPORT SERVICE S.P ROAD WORLI, MUMBAI
## BALANCE SHEET FOR THE YEAR ENDED 31st MARCH 2021

| LIABILITIES | SALARY | NON SALARY | TOTAL | ASSETS | SALARY | NON SALARY | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **CAPITAL FUND** | | | | **Fixed Assets** | | | |
| OPENING BALANCE | (3,494,283) | 1,772,273 | (1,722,010) | As per schedule | 3,993 | 1,304,414 | 1,308,407 |
| Add/(Less):Adjustment in Opening Balance | | | | | | | |
| Add/(Less):Advance written off | | | | | | | |
| Add/(Less):surplus/(Deficit) | 993,687 | 103,845 | 1,097,533 | **Current Assets** | | | |
| | **(2,500,596)** | **1,876,118** | **(624,477)** | **Loan & Advances** | | | |
| | | | | Festival Advance Given to Employees | 13,750 | | 13,750 |
| **Current liabilities** | | | | | | | |
| Salary Payable | 6,062,370 | | 6,062,370 | | | | |
| Festival Advances Agst Salary Recd. From State Govt | 10,000 | | 10,000 | | | | |
| DCPS Payable | 11,384 | | 11,384 | **Cash & Cash Equipment** | | | |
| GIS Payable | 1,800 | | 1,800 | Non Salary Petty Cash Book | - | 23,715 | 23,715 |
| GPF Payable | 40,000 | | 40,000 | Cash Non Salary Book | - | 1,306 | 1,306 |
| HBA Payable | 42,170 | | 42,170 | State bank of India | 230,435 | (261,860) | (31,425) |
| Professional Tax Payable | - | | - | RBI | - | 4,327,494 | 4,327,494 |
| TDS Payable | 45,000 | | 45,000 | | | | |
| **Other Current Liabilities** | | | | | | | |
| Audit Fees Payable | | 55,000 | 55,000 | | | | |
| | 3,712,128 | 1,931,118.37 | 5,643,247 | | 248,178 | 5,395,069 | 5,643,247 |

**BOOKS OF ACCOUNTS HAS BEEN COMPLIED BY US ON THE BASIS OF DATA PRODUCED BEFORE US AND We have not audited or reviewed these financial statements and accordingly we do not express an opinion thereon.**

For Ratan Rathi & Co.
Chartered Accountant
FRN : 108698W

RATAN RATHI & CO. Chartered Accountants F.R.No.108698W Near Natraj Garden,Khamgaon

CA Ratan K. Rathi
Partner
M. No. 036429
UDIN : 25036429BMINKZ6261

Place: Khamgaon
Date: 02/01/2025

MAHARASHTRA STATE COMMISSION FOR PROTECTION OF CHILD RIGHTS,MUMBAI
3RD FLOOR , TRANSPORT SERVICE S.P ROAD WORLI, MUMBAI
INCOME AND EXPENDITURE ACCOUNTS FOR THE YEAR ENDED 31st MARCH 2021

| Expenditure | SALARY | NON SALARY | OTHERS | INCOME | SALARY | NON SALARY | OTHERS |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Salary & Allowances | 8,715,086 | | | **Grant Received** | | | |
| Audit Fee | | 46,209 | | Salary & Allowance | 9,709,478 | | |
| Bank Charges | | 568 | | Grant Received on Non-Salary | | 1,118,300 | |
| Bank Interest | | 1,296 | | | | | |
| Convention Fees | | | | | | | |
| Conveyance Fees | | - | | | | | |
| Computer Expenses | | 1,900 | | | | | |
| Chief Minister Relief Fund | | 32,078 | | | | | |
| Printing and Stationery | | 91,965 | | | | | |
| Tour & Travelling Expenses | | 107,563 | | | | | |
| Advertisement | | 24,528 | | **Other Income** | | | |
| Allowance to Secretary | | 124,755 | | Bank Interest | | | |
| Petrol Expense | | - | | RTI Fees | | | |
| Electricity Expenses | | 116,708 | | Sales of Scrap | | - | 1,296 |
| Car Running Charges | | - | | | | | |
| Internet Charges | | 46,144 | | | | | |
| GST TDS Expense | | - | | | | | |
| GST Late Fees | | 10,000 | | | | | |
| Office Expenses | | 182,763 | | | | | |
| Meeting Allowance | | - | | **Excess of Expenditure Over Income** | | | |
| Misc. Expenses | | - | | | | | |
| News Paper Expenses | | - | | | | | |
| Postage Expense | | 3,744 | | | | | |
| Professional fees | | - | | | | | |
| Sitting & Other allowance | | - | | | | | |
| Telephone Expenses Non Salary | | - | | | | | |
| Repairs & Maintenance Non Salary | | 6,650 | | | | | |
| RTI Fees | | - | | | | | |
| Sale of Scrap Deposited | | | 1296 | | | | |
| Honorarium | | 40,645 | | | | | |
| Convention UNICEF | | - | 0 | | | | |
| Depreciation | 705 | 176,939 | | | | | |
| **Excess income over Expenditure** | 993,687 | 103,845 | - | | | | |
| | 9,709,478 | 1,118,300 | 1,296 | | 9,709,478 | 1,118,300 | 1,296 |

**BOOKS OF ACCOUNTS HAS BEEN COMPLIED BY US ON THE BASIS OF DATA PRODUCED BEFORE US AND We have not audited or reviewed these financial statements and accordingly we do not express an opinion thereon.**

For Ratan Rathi & Co.
Chartered Accountant
FRN : 108698W

RATAN RATHI & CO. Chartered Accountants F.R.No.108698W Near Natraj Garden, Khamgaon

CA Ratan K. Rathi
Partner
M. No. 036429
UDIN : 25036429BMINKZ6261

Place: Khamgaon
Date: 02/01/2025

MAHARASHTRA STATE COMMISSION FOR PROTECTION OF CHILD RIGHTS,MUMBAI
3RD FLOOR , TRANSPORT SERVICE S.P ROAD WORLI, MUMBAI
RECEIPT AND PAYMENT ACCOUNTS FOR THE YEAR ENDED 31st MARCH 2021

| RECEIPTS | SALARY | NON SALARY | OTHERS | PAYMENT | SALARY | NON SALARY | OTHERS |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **Opening Balance:** | | | | Salary & Allowances | 5,140,979 | | |
| Cash in hand | | 10 | | Bank Charges | | 738 | |
| Non Salary Petty Cash Book | | 28,578 | | Printing & Stationary | | 6,515 | |
| State bank of India | 1,968,746 | (201,959) | | Tour & Travelling Expenses | | 8,549 | |
| RBI PLA | - | - | | Conveyance Expenses | | | |
| | **1,968,746** | **(173,371)** | - | Advertisement | | - | |
| | | | | Allowance to Secretary | | 124,755 | |
| **Grant Received:** | | | | Office Expenses | | 11,841 | |
| Salary & Allowances | 9,709,478 | - | - | Petrol Expenses | | | |
| Non-Salary | 290,000 | 828,300 | - | Electricity Expenses | | 116,708 | |
| UNICEF | - | - | - | Language Translation Charges | | | |
| NCPCR | - | - | - | Misc. Expenses | | | |
| | **9,999,478** | **828,300** | - | Postage Expenses | | 2,959 | |
| | | | | Bank Interest Charges | | 11,580 | |
| **Other Receipts** | | | | Internet Charges | | 42,682 | |
| Bank Interest | | 10,284 | | Chief Minister Relief Fund - Non Salary | 32,078 | | |
| Bank Charges | - | 170 | - | Honorarium A/c - Non Salary | 645 | | |
| Sale of Scrap | | 1296 | - | GPF Payable - Salary | 775,000 | | |
| RTI Fees | - | 10 | | GPF Payable (Class IV) - Salary | 60,000 | | |
| Transfer | - | 25000 | | Income Tax Payable - Salary | 890,980 | | |
| From RBI Salary Book | 2,022,974 | | | HBA Payable - Salary | 413,360 | | |
| From SBI Salary | | 126,977 | | GIS Payable - Salary | 27,480 | | |
| From SBI Non Salary | 4200517 | | | DCPS (NPS) Payable - Salary | 181,454 | | |
| | | | | Professional Tax Payable - Salary | 11,800 | | |
| | | | | HRR Payable - Salary | 2,080 | | |
| | | | | Insurance Payable - Salary | 1,416 | | |
| | | | | Sale of Scrap Deposited | | 1,296 | |
| | | | | Grant Refunded | | | |
| | | | | Ajay Londhe | | 36,439 | |
| | | | | Arun Gite | | 24,988 | |
| | | | | Dr Vivek Joshi | | 20,978 | |
| | | | | HT Media Ltd. | | 18,566 | |
| | | | | Indian Express Ltd. | | 5,422 | |
| | | | | K K Chanani | | 22,758 | |
| | | | | Late Fees GST - Non Salary | | 10,000 | |
| | | | | Mohd. Arif | | 6,504 | |
| | | | | Office Expenses Non Salary | | 170,922 | |

RATAN RATHI & CO. Chartered Accountants F.R.No.108088W Near Natraj Garden, Khamgaon

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Pavan Jain | | 22,434 | |
| | | | | Postage Expenses Non Salary | | 785 | |
| | | | | Rohini Lade | | 3,462 | |
| | | | | Sharad Afale | | 1,967 | |
| | | | | Swastik Enterprises | | 1,858 | |
| | | | | RTI Fees | | 10 | |
| | | | | TDS Payable - Salary | | 2,823 | |
| | | | | Tour & Travelling Expenses- Non Salary | | 99,014 | |
| | | | | Transfer(To RBI Salary) | 2,022,974 | 126,977 | |
| | | | | Transfer(To RBI Non Salary) | 4,200,517 | | |
| | | | | Transfer(To Non SalaryPetty Cash) | | 25,000 | |
| | | | | | | | |
| | | | | **Closing Balance** | | | |
| | | | | Cash in hand | | 1,306 | |
| | | | | Non Salary Petty Cash Book | | 23,714 | |
| | | | | State bank of India | 230,435 | (261,860) | |
| | | | | RBI PLA | | 4,327,494 | |
| **Total** | **18,191,715** | **818,667** | - | **Total** | **13,991,198** | **5,019,184** | - |

**BOOKS OF ACCOUNTS HAS BEEN COMPLIED BY US ON THE BASIS OF DATA PRODUCED BEFORE US AND We have not audited or reviewed these financial statements and accordingly we do not express an opinion thereon.**

**For Ratan Rathi & Co.**
**Chartered Accountant**
**FRN : 108698W**

RATAN RATHI & CO. Chartered Accountants F.R.No.108698W Near Natraj Garden, Khamgaon

**CA Ratan K. Rathi**
**Partner**
**M. No. 036429**
**UDIN : 25036429BMINKZ6261**

Place: Khamgaon
Date: 02/01/2025

| BLOCKS OF ASSETS | RATE OF DEPRECIATION | WDV AS ON 01.4.2020 | Addition upto 180days | Addition after 180 days | Sale/Scrap/Deletion During The Year | Sub Total | Depriciation | WDV AS ON 31-03-21 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | (a) | (b) | © | (d) | (a+b+c+d)=(e) | (f) | (e+f)=g |
| Building | | | | | | | | |
| PWD & Civil | 10% | 454102.20 | 0 | 0 | 0 | 454102.20 | 45410.22 | 408691.98 |
| Computers & Accessories | | | | | | | | |
| Computers | 40% | 63539.20 | 0 | 0 | 0 | 63539.20 | 25415.68 | 38123.52 |
| Printer | 40% | 11512.80 | 0 | 0 | 0 | 11512.80 | 4605.12 | 6907.68 |
| Equipment | | | | | | | | |
| Digital Cameras | 15% | 4733.10 | 0 | 0 | 0 | 4733.10 | 709.96 | 4023.13 |
| EPBX | 15% | 60740.57 | 0 | 0 | 0 | 60740.57 | 9111.09 | 51629.48 |
| LED TV | 15% | 16255.53 | 0 | 0 | 0 | 16255.53 | 2438.33 | 13817.20 |
| Projector | 15% | 13954.37 | 0 | 0 | 0 | 13954.37 | 2093.15 | 11861.21 |
| Water Cooler & Purifier | 15% | 7204.77 | 0 | 0 | 0 | 7204.77 | 1080.72 | 6124.05 |
| Xerox Machine | 15% | 22875.79 | 0 | 0 | 0 | 22875.79 | 3431.37 | 19444.42 |
| Biomatrix System | 15% | 4697.70 | 0 | 0 | 0 | 4697.70 | 704.65 | 3993.04 |
| Furniture & Fixtures | 10% | 826434.90 | 0 | 0 | 0 | 826434.90 | 82643.49 | 743791.41 |
| Total | | **1486050.92** | **0** | **0** | **0** | **1486050.92** | **177643.78** | **1308407.13** |

RATAN RATHI & CO. Chartered Accountants F.R.No.106638W Near Natraj Garden

**बाल हक्क संरक्षण आयोग**
**महाराष्ट्र राज्य**

तिसरा मजला, शासकीय परिवहन सेवा इमारत,

सर पोचखानवाला रोड, वरळी,

मुंबई, महाराष्ट्र.

**दूरध्वनी क्रमांक** ०२२-२४९२०८९४ / ९५/९७

**फॅक्स नं.** ०२२- २४९२०८९६

**ई-मेलः** *mscpcr@gmail.com*

**वेबसाइट :** *mscpcr.egov.co.in*